| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ३२ वा | सोमवार दिनांक ०६ एप्रिल, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोन्याची माळ व रक्कम हिसकावली

तुळजापूर पोलीस ठाणे : फिर्यादी रेखा रमेश काळे, वय ६५ वर्षे, रा. माळी नगर ता. माळशिरस जि. सोलापूर या व साक्षीदार या दि.०२.०४.२०२६ रोजी श्री तुळजाभवानी मंदीर येथे दर्शनासाठी आल्या असता छत्रपती शहाजी महाद्वार समोर तुळजापूर येथे असताना अज्ञात महिलांनी रेखा काळे व साक्षीदार यांचे गळ्यातील सोन्याचे दागिने एकुण १,६१,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- रेखा काळे यांनी दि.०२.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### १०,३३,९६२ किंमतीच्या मालाची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.२९.०९.२०२५ रोजी सेरेंटिक रिन्युबल इंडिया प्रा.लि. कंपनीचे वाशी येथील पवनचक्कीचे ३३ के व्ही इलेक्ट्रीक डॉग लाईनची १०३ स्के.एम.एम ची ३७,६०० मिटर ॲल्युमिनीयम तार व पॅथर लाईनची २५३ स्के.एम.एम ची १७००८मिटर उभे पोलवरील लाईनचे ॲल्युमिनीयची तार असा एकुण १०,३३,९६२ किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. तसेच ॲन्युमिनियम ताराचे व इंन्सुलेटरचे अंदाजे ८७,१३,८३४ मालाचे नुकसान झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- रोहित शंकर नेटके,रा. भिसरे ता. करमाळा जि. सोलापूर ह.मु. विकास नगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.०२.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२), ३२४(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोबाईल सोन्याचे दागिणे हिसकावुन घेवुन फरार

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी लक्ष्मण अशोक करवंदे, वय ३१ वर्षे, रा. अंकुशनगर गुरुकृपा कॉलनी बीड हे व त्यांची पत्नी हे गडदेवधरी पाटी जवळील पेट्रोल पंपाजवळ अनोळखी चार इसमांनी मोटरसायकलवर येवून फिर्यादीचे मोटारसायकलला लाथ मारुन खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण करुन रोख रक्कम ३,५०० ओपो कंपनीचा मोबाईल, ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकुण४५,५०० किंमतीचा माल जबरीने हिसकावून घेवून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-लक्ष्मण करवंदे यांनी दि.०३.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०९(४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

झाडे लावा!
झाडे जगवा!!
झाडे तोड रोखा !!!

## येरमाळा येडेश्वरी यात्रेत महिला भाविकांचे गळयातील मंगळसुत्र चोरणारे चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या



धाराशिव (प्रतिनिधी)- दि. ०३/०४/२६ रोजी पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार साहेब स्थागुशा धाराशिव यांच्या आदेशान्वये येरमाळा येथील येडेश्वरी यात्रेमध्ये गर्दीचे ठिकाणी मालाविषयी गुन्हे घडणार नाहीत याकरिता स्थागुशाचे पथक गर्दीचे ठिकाणी पायी पेट्रोलिंग करीत असताना माहिती मिळाली की, आमराई परीसरातील मंदीराचे जवळ गर्दीमध्ये दोन महिला व एक इसम हे गर्दीमध्ये चोरी करण्याचे इरादयाने संशयीतरित्या फिरत आहेत. त्यावरून स्थागुशाचे पथक माहिती मिळालेल्या ठिकाणी पायी चालत जावुन नमुद महिला व पुरूष यांचेवर पाळत ठेवुन थांबले असता ते गर्दीमध्ये चोरी करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे नाव गाव बाबत विचारले असता ते समाधानकारक उत्तरे देत नसल्याने व त्यांचेवर संशय आल्याने त्यांना पोलीस ठाणे येरमाळा येथे आणुन चौकशी केली असता त्यांनी त्यांचे नाव अनिल शेषेराव शिंदे वय ३४ वर्षे, सुनिता अनिल शिंदे वय २९ वर्षे, हिराबाई रमेश शिंदे वय ४० वर्षे,सर्व रा. इंदीरानगर पाथरी ता. पाथरी जि. परभणी असे सांगीतले. त्यांचा संशय आल्याने पंचाना बोलावुन पंचासमक्ष नमुद इसमांची अंगझडती घेतली असता अनिल शिंदे याचे पॅंटचे खिशात ०४ वेगवेगळे सोन्याचे मनी मंगळसुत्र मिळाले. त्याबाबत त्याचेकडे नमुद मिळालेले सोन्याचे दागीन्याबाबत विचारले असता त्याने सांगीतले की, सकाळी ०७.०० ते ०९.०० चे दरम्यान येरमाळा बीड हायवेवर ब्रीज संपल्यावर उजव्या बाजुला रोडलगत यात्रेतील भाविकांना अंघोळीची व्यवस्था केली होती, माझ्यासोबतच्या या दोन महिलांनी तेथे गर्दीमध्ये महिला अंघोळ करत असताना त्यांचे गळयातील सोन्याचे दागीने चोरी करायचे व माझ्याकडे आणुन दयायचे असे सांगीतले.नमुद व्यक्तींनी अंगझडतीमध्ये एकुण ०४ वेगवेगळे मनी मंगळसुत्र एकुण १,३१,००० रू.चे सोन्याचे दागीने मिळुन आल्याने ते गुन्हयात जप्त केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक श्रीमती रितु खोखर व अपर पोलीस अधिक्षक श्रीमती शफकत आमना, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि सचिन खटके, पोलीस हवालदार विनोद जानराव, नितीन जाधवर, बबन जाधवर, महिला पोह शोभा बांगर, चापोह महेबुब अरब, रोहीत दंडनाईक यांचे पथकाने केली आहे.

## येडाई माझा जीव गं जीव... येडाई माझा जीव... चुनखडी वेचण्यासाठी १८ लाख भाविकांची झुंबड



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- चैत्र पौर्णिमेच्या मुहूर्तावर येरमाळा नगरीत भरलेली आई येडेश्वरीची भव्य यात्रा यंदा अक्षरशः विक्रम मोडणारी ठरली. तब्बल १८ लाख भाविकांनी उपस्थिती लावत आई राजा उदे उदेच्या जयघोषात चुनखडी वेचत संपूर्ण परिसर दणाणून सोडला. भक्ती, परंपरा आणि उत्साहाचा संगम असलेल्या या यात्रेत चुना वेचण्याच्या अनोख्या परंपरेला केंद्रस्थानी ठेवत भक्तांनी भावनांचा महापूर ओतला. यंदा गतवेळीच्या तुलनेत दोन लाख भाविकांची अधिकची भर पडली. पालखी चुन्याच्या रानात दाखल होताच आकाशातून हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी केली. गावातील चौक-चौक रांगोळ्या, फुलांची सजावट आणि ढोल-ताशांच्या गजरात पालखीचे जंगी स्वागत झाले.

शुक्रवारी सकाळी ८ वाजता विधिवत महापूजा आणि महाआरतीनंतर देवीची पालखी डोंगरावरील मंदिरातून वाजत गाजत चुन्याच्या रानाकडे निघाली. १० वाजता पालखी रानात पोहोचताच लाखो भाविकांनी चुनखडीचे खडे वेचून पालखीवर अर्पण केले. चुनखडीचे खडे अर्पण करण्याची परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने पाळली जाते. जयराज खोचरे, इतिहास अभ्यासक येरमाळा. येडेश्वरी मातेची पालखी मंदिरातून आमराईच्या परिसरात आली.हलगी-संबळाच्या तालावरभक्त बेभान झाले होते.यादरम्यान भाविकांची मोठ्या संख्येने गर्दी पाहायला मिळाली. येडूसरीचा उदे उदे म्हणत भक्त पालखीबरोबर सहभागी झाले होते. छाया : सुखदेव गायके, येरमाळा

दरवर्षी आई येडेश्वरीच्या यात्रेतील पालखीवर आ. राणा जगजितसिंह पाटील यांच्यावतीने पुष्पवृष्टी केली जाते. त्यानुसार यंदाही शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता परिसरात हेलिप्कॉटरने तीन प्रदक्षिणा घातल्या. लाखो भाविक या पुष्पवृष्टी सोहळ्याचे साक्षीदार झाले. पुष्पवृष्टीच्या हेलिकॉप्टरसाठी १० ते १२ लाख रुपये खर्च करण्यात आला.

देवीला सृजनतेचे प्रतिक मानले जाते. त्यातून पालखी चुन्याच्या रानात आल्यानंतर चुना वेचून देवीला वाहण्याची परंपरा आहे. चुना वेचणे म्हणजेच एकप्रकारे भुमातेची पूजा आहे. वास्तविक पाहता ज्या भागात पाऊस कमी होतो. त्या भागात उन्हामुळे चुना वरती येतो, असे शास्त्र सांगते. इथे मात्र परंपरेचा एक भाग म्हणून पालखी आल्यानंतर चुना वरती येतो, असे सांगितले जाते. ज्या पध्दतीने जमीन अन्न पिकवते. सृजनतेचे प्रतीक म्हणून याला अशा उत्सवाला निसर्गाशी जोडण्यात आले आहे.

चुना वेचणे म्हणजेच घरावर येणारे अरिष्ट दूर होते, दुःख नाहीसे होते. असा भाविकांचा समज आहे. शिवाय आई येडेश्वरी ही आठरापगड जातीची कुलदैवी आहे. ज्यांना कुलदैवत माहीत नाही, ते येडेश्वरीला कुलदैवत करून घेतात. चुनखडी वाहताना देवीला नवस बोलण्यात येतो. ते फेडण्याची परंपरा आहे. या यात्रेची महाराष्ट्रातील मोठ्या यात्रांमध्ये गणना होते. धर्म, लोकसंस्कृती, मनोरंगजनाची परंपरा आहे.

## ७ ते ९ टीव्ही बंद धाराशिवमध्ये शिक्षणाचा क्रांतिकारी प्रयोग!

धाराशिव ( रामेश्वर डोंगरे)- शिक्षण क्षेत्रात नवा इतिहास घडवण्याच्या दिशेने धाराशिव जिल्हा परिषदेकडून एक अनोखा आणि धाडसी उपक्रम राबवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात एकाग्रता वाढावी आणि डिजिटल व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी दररोज सायंकाळी ७ ते ९ या वेळेत टीव्ही बंद ठेवण्याचे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनाने केले आहे.

हा निर्णय केवळ आदेश नसून, शिक्षणासाठी सामाजिक आंदोलन म्हणून पुढे येत आहे.

**उपक्रमामागील भूमिका काय?**

आजच्या काळात मोबाईल, टीव्ही, गेम्स आणि सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासावरचे लक्ष कमी होत असल्याचे अनेक सर्वेक्षणांमधून स्पष्ट झाले आहे. ग्रामीण भागातही ही समस्या मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे.

याच पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनाने हा उपक्रम सुरू करत

*विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाची सवय लावणे

* शिस्तबद्ध वेळापत्रक तयार करणे

*पालकांचा सहभाग वाढवणे

* शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे

**हे प्रमुख उद्दिष्ट ठेवले आहे.**

** पालक-शिक्षकांची जबाबदारी वाढली

या उपक्रमात सर्वात महत्त्वाची भूमिका पालकांची आहे.

*घरात टीव्ही बंद ठेवणे

* मुलांना अभ्यासासाठी प्रोत्साहन देणे

*मोबाईल वापरावर नियंत्रण ठेवणे

शाळांच्या माध्यमातून शिक्षकही विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवणार असून, नियमित फॉलोअप घेतला जाणार आहे.

* शाळा स्तरावर कडक अंमलबजावणी

जिल्ह्यातील अनेक शाळांनी या उपक्रमाला सक्रिय पाठिंबा दिला आहे.

* विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा आढावा

* गृहपाठ पूर्ण करण्यावर भर

* अभ्यास तासांचे नियोजन

यामुळे शिक्षणात सकारात्मक बदल दिसून येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

* जनतेतून संमिश्र प्रतिक्रिया

या निर्णयावर नागरिकांकडून विविध प्रतिक्रिया येत आहेत:

* हा निर्णय योग्य आहे, मुलं अभ्यासाकडे वळतील

**अंमलबजावणी कशी होणार?**

*पालक खरोखर सहकार्य करतील का?

काही ठिकाणी हा उपक्रम कौतुकास्पद मानला जात असला तरी, त्याची अंमलबजावणी हीच खरी कसोटी ठरणार आहे.

* जनतेचा आवाज - थेट प्रश्न

* हा उपक्रम फक्त आवाहन राहणार की कठोरपणे राबवला जाणार?

* मोबाईल वापरावरही निर्बंध येणार का?

* हा प्रयोग यशस्वी झाल्यास संपूर्ण **महाराष्ट्रात लागू होईल का?**

निष्कर्ष

धाराशिव जिल्हा परिषदेकडून सुरू झालेला हा प्रयोग खरोखरच यशस्वी ठरला, तर शिक्षण क्षेत्रात मोठा बदल घडवू शकतो. पण यासाठी प्रशासन, शिक्षक आणि पालक यांची संयुक्त जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे.

टीव्ही बंद पुस्तक सुरू हा संदेश जर घराघरात पोहोचला, तरच या उपक्रमाला खरी यशस्वीता मिळेल.

## पंडित दिनदयाळ उपाध्याय निवासी प्रशिक्षण महाअभियान उत्साहात



धाराशिव (प्रतिनिधी)-भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांची निर्मिती व्हावी या उद्देशाने पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ चे आयोजन संपूर्ण धाराशिव जिल्ह्यामध्ये आमदार राणाजगजीतसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर तसेच माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडत आहेत.

धाराशिव जिल्यातील संघटनात्मक १९ मंडळा पैकी १२ मंडळांमध्ये प्रमुख कार्यकर्त्यांचे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण घेण्यात आले .या प्रशिक्षण वर्गास १२ मंडळातून सुमारे १६८० हून अधिक जेष्ठ, युवा, महिला भगिनी प्रशिक्षित झाल्या आहेत.

या वर्गांमध्ये वैचारिक अधिष्ठान, भारतीय जनता पार्टीचा इतिहास आणि विस्तार, पक्ष संघटन विस्ताराची दृष्टी, पक्षाची कार्यपद्धती, आपल्या सरकारची कामगिरी, सोशल मीडिया आणि -ख तसेच नमो प आणि सरल प, बूथ व्यवस्थापन, मन की बात या विषयांवर सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण महा अभियाना मध्ये १९ मंडळापैकी १२ मंडळामध्ये शिबिरांचे आयोजन यशस्वीरीत्या पार पडले असून उर्वरित मंडलांमधील वर्गांचे पण लवकरच पूर्ण होणार असल्याचे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी सांगितले.

## सरस्वती विद्यालय, शिंगोलीचा 'आय एम विनर' स्पर्धा परीक्षेत दैदिप्यमान निकाल



शिंगोली (प्रतिनिधी) - येथील सरस्वती विद्यालयाने २०२६ सालच्या 'आय एम विनर' स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी छाप उमटवली आहे. विविध इयत्तांतील विद्यार्थ्यांनी केंद्र तसेच तालुका स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे.

इयत्ता पहिलीतील दुर्वा शितोळे हिने केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला, तर उजेर पठाण द्वितीय, समृद्धी पवार तृतीय आणि ऋषिकेश घोंगडे चौथ्या क्रमांकावर राहिला. इयत्ता दुसरीमध्ये आराध्या भोसले प्रथम, अर्णव पवार व ओम पवार द्वितीय, तसेच तृप्ती लामकाने चौथ्या क्रमांकावर झळकली. याच गटातील शौर्य पडवळ पाचवा, अविराज खांडवे सहावा आणि शर्वरी मुळे सहाव्या क्रमांकावर सिफा मुजावर पाचव्या क्रमांकावर यशस्वी ठरले.

इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट कामगिरी करताना जगजीत निंबाळकर तिसरा, विश्वजीत निंबाळकर प्रथम, शिवेंद्र पडवळ व प्रथमेश घोगरे चौथ्या, रुद्र घोंगडे पाचवा, वेदांत घोगरे सातवा तसेच श्रुती निंबाळकर पाचव्या क्रमांकावर हर्षद घोगरे सहाव्या क्रमांकावर यश मिळवले. इयत्ता चौथीमध्ये प्रत्युष रणखांब प्रथम, सुबोध शिंगारे द्वितीय, अनुराग वीर चौथा, अथर्व जंगम सहावा आणि स्वरा निंबाळकर सातवा क्रमांक पटकावण्यात यशस्वी झाले. इयत्ता पाचवीमध्ये श्रुती शिंदे प्रथम, ओम पोळ द्वितीय, प्रणित जगताप तृतीय, श्रेया खुणे चौथी आणि राहुल पडवळ पाचवा क्रमांक मिळवत यशाची परंपरा कायम राखली.

या सर्व विद्यार्थ्यांना सारिका गाढवे, अश्विनी लबडे, मनीषा शिंगारे, सुलताना पठाण व कोंढारे मॅडम यांनी परिश्रमपूर्वक मार्गदर्शन केले. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापक व संस्थापक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## आवकाळी पावसाने उत्पादन ५० टक्के घटण्याची शक्यता

वाशी तालुक्यातील आंबा उत्पन्नात घट होणार असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. अवकाळी पावसाने आंबा उत्पन्न ५० टक्क्यांहून अधिक घटीची शक्यता आहे. नुकसानीची पाहणी करण्यासाठी कृषी विभाग व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ यांच्या वतीने शास्त्रज्ञांनी आंब्याच्या बागांची पाहणी केली.

या वेळी पाहणीसाठी आलेल्या केसर आंबा गुणवत्ता केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. संजय पाटील यांनी तालुक्यातील विजोरा येथील आंब्याच्या बागेची पाहणी केली. या वेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना अंबा मोहोर लागण्यासाठी एक महिना उशीर, मोहोर येण्याच्या कालावधीत असलेली थंडी खूप काळ राहिल्याने फुलांचे रूपांतर फळात झाले नाही. मोहोराचे दांडे लांब राहून नर फुलांचे अधिक प्रमाण त्यातच अवकाळी पाऊस, वादळी वारे या सर्वांचा परिणाम होऊन उत्पन्न ४० ते ५० हून घट होणार असल्याचे स्पष्ट केले. त्याच बरोबर राहिलेले फळ टिकून राहण्यासाठी युरिया (२ टक्के), एनएएन (२० पीपीएम),पोटॅशियम नायट्रेट (१ टक्के) ची दर १५ दिवसांनी फवारणी घेणे, उपलब्धतेनुसार पाट पाणी, उन्हापासून बचावासाठी कागदी पिशव्यांचा वापर करण्याचा सल्ला देखील अंबा उत्पादक शेतकऱ्यांना दिला.

या वेळी वाशीचे कृषी अधिकारी राजाराम बरवे, कळंबचे बी. एच. सरडे, उप कृषी अधिकारी जाधव, सहाय्यक कृषी अधिकारी रणजीत काकडे, लक्ष्मण जाधव यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## महसुली विभागात सुधारणा

राज्यात महसुली विभाग सुधारला तर राज्य शासन लोकप्रिय होवू शकते. सर्वाधिक टिका ही महसुली विभागावर होते, मात्र या विभागाकडे राज्य शासनाचे लक्ष असल्याने आता हा विभाग कात टाकत आहे. येत्या काही दिवसांत राज्यातील सर्व जमिनींच्या फेरफार नोंदींची सखोल चौकशी सुरू करण्याचे आश्वासन महसूल मंत्र्यांनी विधानसभेत दिली आहे. जनतेचा महसूल विभागावरील विश्वास टिकवण्यासाठी सरकारने घेतलेला निर्णय योग्यच आहे. सर्वसामान्यांच्या जमिनी हडप करणाऱ्यांना कोणतीही माफी नाही, असे म्हणत जमीन फेरफार प्रकरणात सरकार ॲक्शन मोडमध्ये आले आहे. या विषयातील सर्व पैलू जाणून घेण्यासाठी, सर्वप्रथम गेडाम समितीची स्थापना का करण्यात आली आणि समितीने केलेल्या पडताळणीच्या निष्कर्षांबाबत जाणून घेणे आवश्यक आहे. पुण्यातील जमीन अभिलेखांमधील प्रक्रियात्मक गैरवापर आणि बेकायदेशीर फेरफारांबाबतच्या तक्रारी २०20 पासून दरवर्षी वाढत चालल्या आहेत. या वाढत्या तक्रारींची दखल घेऊन महसूल विभागाने नाशिकचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या नेतृत्वाखाली सप्टेंबर २०२५ मध्ये चौकशी समिती स्थापन केली. समितीने पुणे जिल्ह्यातील गेल्या पाच वर्षांतील, प्रामुख्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम १५५ वापरून, दिलेल्या ३८,०२७ फेरफार आणि दुरुस्तीच्या आदेशांची तपासणी केली. यापैकी केवळ २,३३७ प्रकरणांची कागदपत्रे तपासासाठी उपलब्ध होती. तपासात ४२४ प्रकरणांमध्ये गंभीर अनियमितता आणि कायदेशीर प्रक्रियांचे उल्लंघन दिसून आले. या प्रकरणांचे अ (सर्वात गंभीर), ब (मध्यम) आणि क (किरकोळ अनियमितता) अशा तीन गटांत वर्गीकरण केले गेले. समितीने एकूण १५२ महसूल अधिकाऱ्यांना दोषी ठरवले. अनेकांनी देवस्थानची जमीन हडप केली आहे. अनेक राजा व सरदारांनी भक्तीभावाने वारकऱ्यांच्या विश्रांतीसाठी जमीन दान दिल्या होत्या. यात काही तुळजापूर परिसरात देखिल असे प्रकरण शोधले तर सापडतील. यात राज्यस्तरावर विचार केला तर बडी मंडळीचा समावेश असल्याचे समजते. 'अ' गटातील १३ गंभीर प्रकरणांशी संबंधित अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. या प्रकरणांतील दोषी अधिकाऱ्यांवर निलंबन आणि कायदेशीर मत घेऊन फौजदारी कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल. 'ब' आणि इतर गटातील अधिकाऱ्यांवर बदली, नॉन-एक्झिक्युटिव्ह पदांवर नियुक्ती किंवा इतर विभागीय कारवाई करण्याची शिफारस आहे. तसेच सर्व प्रकरणांची पुन्हा तपासणी करून मूळ जमिनीचे रेकॉर्ड सहा महिन्यांत पूर्ववत करण्याचे निर्देश जारी केले आहेत. या प्रकरणामुळे राज्याच्या विविध भागांत अशाच प्रकारच्या फेरफार निर्णयांची चौकशी करण्यासाठी समित्या स्थापन करण्याची गरज असल्याचे स्पष्ट दिसून येते. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अलीकडेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम १५५, १८२, २२० आणि २५७ च्या होणाऱ्या गैरवापराबाबत विधानसभेत तसेच पत्रकारांशी बोलताना चर्चा केली. पण ही कलमे कशाशी संबंधित आहेत? महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम १५५ हे जमीन महसूल अभिलेखांमधील शुद्धलेखन किंवा गणनेच्या चुकांसह कारकुनी चुका सुधारण्यासाठी आहे. तथापि, काही मोजक्या अधिकाऱ्यांकडून जमिनीची मालकी बदलणे, क्षेत्रफळ वाढवणे, जमिनीचे वर्गीकरण सुधारणे आणि अगदी बँकेचे कर्ज किंवा खटल्याच्या नोंदी काढून टाकण्यासाठी याचा गैरवापर केला गेल्याचे दिसून येते. दिलेल्या अधिकाराच्या अशा गैरवापरामुळे जमिनींचे फसवणूकपूर्ण हस्तांतरण करणे सोपे होते आणि व्यवहारांवर कायदेशीर विवाद निर्माण होण्याचा धोका वाढतो. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम १८२ आणि २२० हे सरकारी थकबाकी वसुलीसाठी मालमत्ता जप्ती आणि लिलावाशी संबंधित आहेत. मालमत्ता जप्त करण्यासाठी आणि त्या पसंतीच्या बोलीदारांना विकण्यासाठी या कलमांच्या गैरवापराबाबत अनेक तक्रारी आहेत. याशिवाय, आणखी एक कलम ज्याचा कथितरीत्या दुरूपयोग केला जातो, ते म्हणजे कलम २५७. पण पुणे विभागात सर्वात अधिक गैरवापर आढळला तो म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम १५५ चा. हे नजरेआड करून चालणार नाही. हा सगळा प्रकार थांबवण्यासाठी आता संपूर्ण पुणे महसूल विभागात गेल्या पाच वर्षांत झालेल्या जमिनींच्या सर्व फेरफार नोंदींची सखोल चौकशी सुरू होणार आहे. पण प्रथम हे जाणून घेणे गरजेचे आहे की, पुणे महसूल विभागात पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुणे विभागांतर्गत पाच जिल्ह्यांमधील संशयास्पद जमीन महसूल निर्णयांची सखोल चौकशी करण्याचे आदेश पुणे विभागीय आयुक्तांना दिले आहेत. ही चौकशी लवकरच सुरू होईल. अर्ज केल्यावर लगेच निकाली काढलेली प्रकरणे, ऑनलाइन प्रणालीला बगल देऊन ऑफलाइन स्वीकारलेले अर्ज आणि नोटीस न बजावता दिलेले एकतर्फी आदेश यांवर यात लक्ष केंद्रित केले जाण्याची शक्यता आहे. निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी, अधिकारी त्यांच्या स्वतःच्या तालुक्यातील कामाची तपासणी करणार नाहीत, याची खात्री केली जाईल. पारदर्शकतेसाठी अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची आंतर-जिल्हा पथके तयार करण्यात आली आहेत. अनियमितता 'अ', 'ब' आणि 'क' या श्रेणींमध्ये वर्गीकृत केली जाईल. जिल्हाधिकारी सर्व प्रकरणांची पुनर्पडताळणी करून सरकारला अंतिम अहवाल सादर करतील. असे सध्याला दिसून येत आहे. सरकारने पहिल्यांदा सरकारी गायराण जमीनी तसेच देवस्थानला दान केलेल्या जमीनीचा शोध घेवून जे कोणी स्वस्तात किंवा दंडेल शाहीने जमीन हडप केली आहे. त्याचा शोध घेतला पाहिजे. देवाची जमीन हडप करणारे शोधले तर सापडतील. हे काम महसुली विभागाचे आहे. ते आता प्रामाणिकपने करतील अशी आशा आहे. राज्यात अनेक सरकारी जमीन हडप केल्याचे उदा. उघडे पडलेतर शेवटपर्यंत तपास होणे अपेक्षित असते तसे होत नसेल तर सुधारणा होणे अपेक्षित आहे.

# क्रीडांगणावरील संघर्ष जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यास बळ देतो

### प्रेरणा होनराव यांचे प्रतिपादन; 'विश्वमैदान क्रीडा महोत्सव २०२६' बक्षीस वितरण समारंभ उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :** आयुष्यात यशासोबत अपयशाचाही सामना करावा लागतो; मात्र पराभवानंतर खचून न जाता नव्या जिद्दीने पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा खेळातून मिळते. शिक्षण आणि क्रीडा या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून, क्रीडांगणावरील संघर्ष विद्यार्थ्यांना जीवनातील विविध आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्याची ताकद देतो, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश प्रवक्त्या तथा नगरसेविका प्रेरणा होनराव यांनी केले.

माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या वतीने आयोजित 'विश्वमैदान २०२६' या आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवाच्या बक्षीस वितरण समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, कर्करोग शल्य चिकित्सक डॉ. ब्रिजमोहन झंवर, भूल तज्ज्ञ डॉ. आरती झंवर, एमयूएचएस उपकेंद्राचे समन्वयक डॉ. संतोष डोपे, संचालक प्रा. तेजस कराड, जिल्हा कारागृह अधीक्षक बी. एन. मुलानी, उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, प्राचार्य सायस मुंढे, डॉ. विराज सोळंके, डॉ. सचिन गरुड, आशा मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रेरणा होनराव म्हणाल्या, 'विश्वमैदान' ही संकल्पनाच प्रेरणादायी आहे. हे नाव उच्चारताच प्रत्येकाच्या आयुष्यातील संघर्षाच्या मैदानाची जाणीव होते. लातूर मध्ये वैद्यकीय शिक्षणाची मोठी चळवळ उभी करून डॉ. हनुमंत कराड यांनी शिक्षणाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. माईर एमआयटी समूह केवळ शैक्षणिक गुणवत्तेलाच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्कृती आणि क्रीडा क्षेत्रालाही तेवढेच महत्त्व देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

महिला सक्षमीकरणाचा मुद्दा उपस्थित करताना त्यांनी मुलींच्या क्रीडा क्षेत्रातील वाढत्या सहभागाची गरज अधोरेखित केली. राजकारण आणि प्रशासनात महिलांची उपस्थिती वाढत असली, तरी आपल्या भागातील मुलींचा क्रीडा स्पर्धांमधील सहभाग अजूनही अधिक वाढण्याची आवश्यकता आहे. पुढील वर्षी 'विश्वमैदान' मध्ये मुलींचा अधिकाधिक सहभाग दिसावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुली मैदानात उतरल्या की त्या जिद्दीने यश संपादन करतात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कर्करोग शल्य चिकित्सक डॉ. ब्रिजमोहन झंवर म्हणाले की, खेळ केवळ शारीरिक सुदृढता देत नाही, तर तो शिस्त, वेळेचे नियोजन आणि आत्मसंयमही शिकवतो. ही कौशल्ये कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी अत्यावश्यक असतात. विजयाने गर्विष्ठ होता कामा नये आणि पराभवाने खचूनही चालत नाही; कारण प्रत्येक पराभव हा पुढील मोठ्या विजयाची पहिली पायरी असतो, असे ते म्हणाले.

आजची तरुण पिढी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आभासी जगात अडकत चालल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. या डिजिटल जगातून बाहेर पडून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मैदानावर घाम गाळणे आवश्यक आहे. त्यातूनच शारीरिक आणि मानसिक आरोग्य अधिक सक्षम राहते, असे त्यांनी सांगितले.

डॉ. आरती झंवर यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यदायी जीवनशैलीवर भर दिला. केवळ पुस्तकी ज्ञानात अडकून न पडता शारीरिक स्वास्थ्याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. पोषणयुक्त आहार, नियमित व्यायाम, मानसिक ताणतणावाचे योग्य नियोजन आणि पुरेशी झोप हे आरोग्याचे चार मूलभूत स्तंभ असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या महाविद्यालयीन जीवनाच्या आठवणींना उजाळा देताना त्यांनी सांगितले की, चार भिंतींच्या आत सतत बसून राहिल्याने शरीराला आवश्यक व्हिटॅमिन डी मिळत नाही आणि थकवा जाणवू लागतो. त्यामुळे मैदानी खेळ हा केवळ विरंगुळा नसून, तो शारीरिक ऊर्जेचा महत्त्वाचा स्रोत आहे. ही खेळाची सवय स्पर्धेपुरती मर्यादित न राहता आयुष्याचा कायमस्वरूपी भाग व्हावी, असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

जिल्हा कारागृह अधीक्षक बी. एन. मुलानी म्हणाले की, 'विश्वमैदान २०२६' मुळे महाविद्यालयीन तरुणांमधील क्रीडा वृत्तीला चालना मिळाली आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ खेळण्याची संधी मिळालेली नाही, तर त्यांच्यात आत्मविश्वास, संघभावना आणि स्पर्धात्मकता विकसित झाली आहे. खेळाडू स्वतःसाठी नव्हे, तर आपल्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत असतात, ही जाणीवच त्यांना अधिक जबाबदार आणि यशस्वी बनवते, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, 'विश्वमैदान क्रीडा महोत्सव' हा केवळ स्पर्धांचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. मैदानावर शिकलेली शिस्त ही जीवनातील प्रगतीची पायाभरणी ठरते. ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना आपले सुप्त गुण आणि क्रीडा कौशल्य दाखवण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हाच संस्थेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कोणत्याही स्पर्धेत एकच विजेता असतो; परंतु याचा अर्थ उर्वरित सर्व अपयशी आहेत, असा होत नाही. ज्यांना यश मिळाले नाही, त्यांनी अधिक जिद्दीने आणि सातत्याने सराव करून पुढील संधीसाठी सज्ज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात क्रीडा प्रतिभा दडलेली असून, तिला योग्य दिशा आणि सुविधा मिळाल्यास हे विद्यार्थी राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर चमकू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात प्रा. तेजस कराड यांनी पाच दिवसीय 'विश्वमैदान क्रीडा स्पर्धे' चा सविस्तर आढावा सादर केला. यानंतर विविध क्रीडा प्रकारांतील विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते चषक आणि प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रणोती चिंचणसुरे आणि डॉ. प्राजक्ता गायकवाड यांनी केले, तर आभार डॉ. वर्षा सांगळे यांनी मानले. या समारंभास लातूर जिल्ह्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आपल्या भागातील धार्मिक स्थळे विकसित करणार : मा. मंत्री आमदार बनसोडे



**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर मतदार संघाचा सर्वांगीण विकास करताना मतदार संघातील सर्व जाती - धर्मांना न्याय दिला. उदगीर व जळकोट तालुक्यातील विविध गावातील सर्व धार्मिक स्थळांना निधी उप-लब्ध करून देवून त्यांचा विकास केला. या पुढील काळातही श्री मलयाप्पा मंदिराला ये - जा करण्यासाठीचा रस्ता जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून करणार असल्याचे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

ते नांवदी ता.उदगीर येथील श्री मलयाप्पा मंदिराच्या कळशारोहण सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

यावेळी लातूर जि.प.चे बांधकाम व आरोग्य सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार येणकीकर, जिल्हा परिषद सदस्य रामचंद्र तिरुके , ज्ञानोबा केंद्रे माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, नावंदीचे सरपंच ब्रह्मजी केंद्रे, श्याम डावळे, सर्जेराव भांगे, डॉ.गंगाधर पारगे, संतोष परगे, सतीश केंद्रे, समीर परगे, विशाल कोतागडे, रामेश्वर पाटील, अमोल बिरादार, राजकुमार बिरादार, बालाजी मादळे, संजय फुले, विष्णु फुले, सत्यवान बिरादार, जगु परगे, विठ्ठल फुले, सुरेश केंद्रे, विश्वनाथ बिरादार, दिपक तोंडारे, युवराज कांडगिरे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी आपल्या सर्वांना धार्मिक वारसा आहे. दया आणि कृपा ही ईश्र्वराची देण आहे. 'भक्ती हीच सर्वश्रेष्ठ शक्ती आहे' आणि ही भक्ती आम्हाला गुरुंनी शिकवली म्हणूनच आज या परिसरात भक्तीचा सुगंध पसरला आहे. आपण सर्वजन ईश्र्वराच्या भक्तीत तल्लीन होतो व ईश्र्वराचेच नामस्मरण करतो असे केल्याने आपल्या मनाला समाधान लाभुन ईश्र्वराच्या नामस्मरणाने ऊर्जा मिळत असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

मतदार संघातील सर्व जनतेच्या सुखासाठी श्री मलयाप्पा मंदिरात आपण दर्शन घेवुन त्यांच्या चरणी साकडे घातले आहे.

आपण सर्व माझ्या माता भगिनी व माझ्या बांधवांनी माझ्यावर मोठा विश्र्वास दाखवून दुसऱ्यांदा मोठे मताधिक्य देवुन निवडून दिलात म्हणून मी 'जे जे नव ते ते उदगीरला हवं' या ब्रीद वाक्याप्रमाणे आपल्या उदगीरचा विकास केला आहे असुन यापुढे ही विकासाची गंगा तुमच्या दारापर्यंत पोहचवणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी उदगीर सह पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ब्रेस्ट मिल्क काढण्यासाठी पंपिंग करणे योग्य की अयोग्य? यामुळे बाळाच्या स्तनपानावर काय परिणाम होतो?

प्रसुतीनंतर काही आठवड्यांनी जेव्हा आई पुन्हा कामावर रुजु होण्याचा किंवा बाळाला काही काळासाठी घरी ठेऊन बाहेर जाण्याचा विचार करते तेव्हा तिच्यासमोर सगळ्यात मोठा प्रश्न हा उभा राहतो की बाळाचे स्तनपान कसे सुरु राहिल? यावर पर्याय म्हणजे ब्रेस्ट पंपचा वापर. हे वापरल्याने स्तनातील संपूर्ण दूध काढून घेता येतं, जेणेकरून जास्त दूध तयार देखील होतं.

बाळाला यशस्वीपणे जन्म दिल्याबद्दल अभिनंदन. नवीन मात्र ब्रेस्ट पंपिंगबद्दलच्या अनेक गैरसमजांमुळे महिलांमध्ये अनावश्यक भीती निर्माण करतात.या गैरसमजुती कोणत्या आणि त्यामागची वास्तविकता काय आहे हे या लेखाच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात आले आहे.

गैरसमज: पंपिंग म्हणजे बाळ व्यवस्थित स्तनपान करू शकत नाही

वास्तविकता: थेट स्तनपान किंवा ब्रेस्ट पंपने काढलेले दूध पिणे दोन्ही परिस्थितीत बाळाला समान पोषण मिळते. पंपिंगमुळे रोगप्रतिकारशक्ती वाढण्यासही मदत होते. त्यामुळे गोंधळून जाऊ नका किंवा घाबरू जाऊ नका. काम, आरोग्याच्या समस्या किंवा बाळाशी संबंधित आव्हानांमुळे थेट स्तनपान शक्य नसतानाही, पंपिंगमुळे मातांना स्तनपान सुरू ठेवता येते.

गैरसमज: पंपिंग केल्याने दुधाची पोषकता कमी होते. बाळाला आवश्यक पोषक तत्व मिळत नाहीत

वास्तविकता: पंप केलेले स्तनपान हे थेट स्तनपानाइतकेत पोषक असते. अशावेळी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. पंप केलेल्या दुधातही त्याच अँटीबॉडीज, प्रथिने, चरबी आणि जीवनसत्त्व असतात. दुधाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी योग्यरित्या साठवणे आणि स्वच्छता महत्त्वाची आहे, परंतु पंपिंगमुळे स्वत:हून स्तनपानाचे पोषणमुल्य कमी होत नाही. तुम्ही बाळासाठी सुरक्षितपणे दूध पंप करू शकता.

गैरसमज: ब्रेस्ट पंप वापरणे वेदनादायक आणि हानिकारक आहे; त्यामुळे ब्रेस्ट पंप टाळणेच योग्य

वास्तविकता: अनेक महिला ब्रेस्ट पंपिंगचा पर्याय निवडतात आणि त्यामुळे कोणत्याही प्रकारची अस्वस्थता किंवा वेदना होत नाही. योग्य आकाराचा पंप, सक्शन आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर केल्यास कोणतीही अडचण येत नाही. आधुनिक ब्रेस्ट पंप कोणत्याही समस्येशिवाय बाळाच्या नैसर्गिक स्तनपानाच्या पद्धतीप्रमाणेच प्रभावी ठरते. त्यामुळे ताण घेऊ नका आणि तज्ञांनी सांगितल्यानुसार ब्रेस्ट पंपचा वापर करा.

गैरसमज: ब्रेस्ट पंपमुळे दुधाच्या पुरवठ्यावर परिणाम होतो आणि दुध उत्पादन कमी होते, ज्यामुळे बाळ भुकेले आणि अशक्त राहते

वास्तविकता: उलट, नियमित पंपिंगमुळे शरीराला अधिक दूध तयार करण्याचा संकेत मिळतो. पंपिंग सत्र चुकवणे, चुकीच्या आकाराचे फ्लेंज वापरणे किंवा पंपिंगचे अयोग्य तंत्र यामुळे दुधाच्या पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. जेव्हा बाळाच्या आरोग्याचा प्रश्न येतो, तेव्हा तज्ज्ञांचा सल्ला घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. जर तज्ञांनी तुम्हाला ब्रेस्ट पंप वापरण्याचा सल्ला दिला असेल, तर योग्य प्रकारे पंप कसा वापरावा हे त्यांच्याकडून समजून घ्या.

०००००००००००००००००००००००००

# तंत्रज्ञानाद्वारे जनसेवेचा नवा आदर्श; ठाणे पोलीस आयुक्तालयाचा गौरवपूर्ण प्रवास

महाराष्ट्र शासनाच्या '१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम' अंतर्गत ठाणे पोलीस आयुक्तालयाने राज्यातील १२ आयुक्तालयांच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून प्रशासकीय उत्कृष्टतेचा नवा मापदंड प्रस्थापित केला आहे. २८ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस आयुक्त श्री.आशुतोष डुंबरे व त्यांच्या चमूला या यशाबद्दल प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. हे यश केवळ प्रशासकीय सुधारणा नसून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसामान्य नागरिकांना पारदर्शक आणि जलद सेवा देण्याच्या वचनबद्धतेचे फळ आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालयाने आपल्या कार्यप्रणालीत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी सात मुख्य घटकांवर लक्ष केंद्रित केले होते. यामध्ये आयुक्तालयाचे अधिकृत संकेतस्थळ आता अधिक सुलभ आणि सुरक्षित करण्यात आले असून, ते थउअऋ २.१ अअ मानकांनुसार अपंग व्यक्तींसाठीही वापरण्यायोग्य बनवले आहे. प्रशासकीय कामात वेग आणण्यासाठी ।ध्षग्म प्रणालीचा १००म अवलंब करण्यात आला असून, तब्बल २,१७,६५२ फाईल्सचा निपटारा डिजीटल पद्धतीने करण्यात आला आहे, ज्याची टक्केवारी ९८.६५म इतकी प्रभावी आहे. ठाणे पोलिस आयुक्तालय ई-ऑफिस प्रणालीच्या वापरत राज्यात प्रथम क्रमांकावर आहे.

नागरिकाभिमुख सेवांमध्ये 'आपले सरकार' पोर्टलद्वारे प्राप्त झालेल्या २,१९६ अर्जांपैकी २,०९३ अर्ज निकाली काढून ९५.३५म यशाचा दर गाठला आहे. तसेच पी.जी. पोर्टलवर ९९म आणि सिटीझन पोर्टलवर ९९.६८म तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.

महिला आणि नागरिकांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या 'निर्भय ठाणे' व्हॉट्सअॅप चॅटबॉट (९३२६५२०५२५) ला प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, आतापर्यंत १,९५५ हून अधिक नागरिकांनी १३,८५० वेळा या प्रणालीशी संवाद साधला आहे. यामध्ये ऑनलाईन तक्रारी (३५४), पोलीस ठाणे माहिती (३४७) आणि ट्रॅफिक अपडेट्स (२९१) यांसारख्या सेवांचा समावेश आहे.

गुन्हे नियंत्रण आणि तपासात कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) आणि उघए (भौगोलिक माहिती प्रणाली) चा वापर हे ठाणे पोलिसांच्या यशाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले आहे.

'त्रिनेत्र' ॲपच्या माध्यमातून २४,३०० हून अधिक गुन्हेगारांची माहिती संकलित करण्यात आली असून, ईीए (चेहरा ओळख प्रणाली) द्वारे आरोपींची ओळख पटवणे सोपे झाले आहे.

घ्ऊश्ए प्रणालीद्वारे ६९,२६४ वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करून ३६,३८,०००- रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ''आपले ठाणे सुरक्षित ठाणे आणि आ-पले ठाणे निर्भय ठाणे'' या उघए आधारित दोन्ही उपक्रमामध्ये गुन्हेगारांच्या घरांचे मॅपिंग झाल्यामुळे व तेथे पोलिस कर्मचाऱ्यांनी नियमितपणे भेटी दिल्यामुळे गुन्हेगारांवर वचक निर्माण झाला असून, २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये गुन्ह्यांच्या प्रमाणात १२म घट नोंदवण्यात आली आहे.

अंतर्गत प्रशासनातही आयुक्तालयाने पारदर्शकता आणली आहे. पोलीस कल्याण निधीच्या १३ सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या असून, लाभार्थ्यांना मदतीची रक्कम थेट बँक खात्यात जमा केली जाते. कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी पोलीस वेलनेस सेंटर आणि सायबर गुन्हे पिडीतांसाठी सायबर समुपदेशन केंद्र (ज्याद्वारे ४५ पिडीतांचे समुपदेशन झाले) कार्यान्वित करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी या यशाबद्दल सर्व अधिकारी आणि अंमलदारांचे अभिनंदन करतानाच, भविष्यातही अशाच समर्पित भावनेने कार्य करून नागरिकांचा विश्वास संपादन करण्याचे आवाहन केले आहे.

# अवकाळीने दाणादाण

कमी वेळेत जास्त पाऊस हा हवामान बदलाचा नवा प्रकार अस्तित्वात आल्याने या बदलत्या नैसर्गिक स्थितीपुढे जुन्या पायाभूत सुविधा पुरेशा पडू शकत नाहीत, असा अनुभव अलीकडे सातत्याने येत आहे. गेल्या चार दिवसांपासून राज्याला अवकाळी पावसाने झोडपून काढले आहे. राज्याच्या विविध भागांत झालेल्या या पावसाने शेत पिकांचे मोठे नुकसान झाल्याच्या बातम्या येत आहेत. आधीच संकटात सापडलेल्या शेतकर्यांसमोर नव्या अडचणी उभ्या राहिल्या आहेत. गेल्या वर्षीच्या अवकाळी पावसाने व अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीतून शेतकरी सावरत नाही तोच निसर्गाने त्यांच्यासमोर मोठे नवे संकट उभे केले आहे. नाशिक, बीड, परभणी, नांदेड जिल्ह्यात उभ्या पिकांचे, बागायतीचे, कांद्याचे मोठे नुकसान झाले आहे. धुळे जिल्ह्यातही कांदा, गहू, मका यांसारख्या पिकांचे नुकसान झाले आहे. पुणे जिल्हाही त्याला अपवाद नाही. विविध भागांना अवकाळीचा तडाखा



बसत असताना पुण्यातही परवा तुफानी पावसाने झोडपले. भरदुपारी पुण्यात अंधाराचे साम्राज्य पसरले आणि अवघ्या तासा-दीड तासातच सारे पुणे आणि परिसर जलमय झाले. पुण्यात झालेला हा पाऊस विक्रमी म्हणावा लागेल. या आधी ४ एप्रिल १८९६ रोजी पुण्यात सर्वाधिक म्हणजे ५१.१ मिलीमीटर पाऊस झाला होता. तेव्हाचा तो विक्रम पुण्यात आणि उपनगरात पडलेल्या परवाच्या पावसाने मोडीत काढला आहे. खडकवासला परिसरात १०४ मिलीमीटरपेक्षा अधिक तर सिंहगड रस्ता परिसरात १०० मिलीमीटर पाऊस झाल्याची नोंद वेधशाळेने केली आहे. अनेक सोसायट्या आणि वसाहतींमध्ये पाणी शिरले, झाडे पडली, प्रचंड वाहतूक कोंडी झाली. रस्त्यांना ओढे-नाल्याचे स्वरूप आले. अचानक आलेल्या या पावसाने आपली प्रशासकीय यंत्रणा किती निष्क्रिय आणि नियोजन शून्य आहे याचे दर्शन झाले. अवघ्या काही तासांत झालेली अतिवृष्टी हा हवामान बदलाचा थेट परिणाम असल्याचे म्हटले जाते. हवामान बदलामुळे पृथ्वीचे तपमान वाढत आहे. ही गरम हवा जास्त आर्द्रता शोषून घेते. यामुळे जेव्हा पाऊस पडतो, तेव्हा तो कमी वेळेत; पण अतिशय तीव्र स्वरूपाचा होतो. पूर्वी दीर्घकाळ चालणारा पाऊस आता कमी दिवसांत; पण अधिक तीव्रतेने कोसळतो. पुण्यासारख्या शहरात पसरलेल्या काँक्रिटच्या जंगलामुळे स्थानिक तपमानात वाढ होत असून, बाष्पयुक्त ढगांना वर ढकलल्यामुळे शहराच्या काही भागात धुवाधार तर काही भागात तुरळक स्वरूपात पाऊस अशी विषम स्थिती आढळते.

**अनियोजित शहरीकरण**

बदलत्या नैसर्गिक स्थितीला तोंड देऊ शकणारी नागरी सुविधा व्यवस्था नाही, हे परवाच्या पावसाने सिद्ध केले. यामागे प्रशासनाची डोळेझाक तर आहेच; पण पुढच्या वीस-पंचवीस वर्षांचे नियोजन करण्यातही आपण कमी पडतो. पुणे शहर गेल्या दोन दशकात झपाट्याने वाढले. आयटी क्षेत्राचा विकास, शिक्षणाच्या सुविधा आणि रोजगाराच्या संधी यामुळे मोठ्या प्रमाणावर पुण्यात बाहेरून स्थलांतर वाढले आहे. शहरी लोकवस्ती ज्या झपाट्याने वाढते त्या प्रमाणात पायाभूत सुविधांचा विकास झाला नाही. रस्ते, सांडपाणी व्यवस्था, पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होईल अशी व्यवस्था याकडे प्रशासनाचे सपशेल दुर्लक्ष झाले. सिमेंट काँक्रिटचे, पाण्याचा निचरा न होणारे रस्ते यामुळे थोडा पाऊस झाला तरी पाणी मोठ्या प्रमाणात साचते. सिमेंटचे रस्ते करण्यात स्थानिक ठेकेदारांचे हित सांभाळण्याची प्रशासनाची आणि राज्यकर्त्यांची मानसिकता हे त्याचे कारण आहे. पूर्वी पावसाचे पाणी ज्या वेगाने वाहून नेले जात होते तेच आता थांबले आहे. पावसाळ्यापूर्वी केली जाणारी नाले सफाईची आणि नदीपात्रातील गाळ काढण्याची कामे वेळेवर केली जात नाहीत. किंबहुना त्याचे नियोजन हा केवळ कागदावरचा प्रकार राहतो. रस्त्यावरील कचरा, अस्ताव्यस्त टाकल्या जाणार्या प्लास्टिकच्या पिशव्या यांसारखे अडथळे पाणी वाहून नेण्यास प्रतिबंध करतात. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिका आणि प्रशासनाकडून दीर्घकालीन उपाययोजनांची आवश्यकता आहे. दरवर्षी तुफानी पावसाने झोडपल्यानंतरच प्रशासनाला जाग येते आणि या सर्व बाबींचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो ही चिंतेची बाब आहे. नागरिकांचीही यात जबाबदारी आहेच. अन्यथा अनियोजित शहरीकरणाची मोठी किंमत आपल्या सर्वांनाच चुकवावी लागेल.

# हल्ला दिएगो गार्सिया वर; चिंता भारताला




प्रा. जयसिंग यादव

हिंदी महासागरातील 'दिएगो गार्सिया' या अमेरिका आणि ब्रिटनच्या संयुक्त तळावर हल्ला करून इराणने जगाला आश्चर्याचा धक्का दिला. हा हल्ला पूर्ण यशस्वी झाला नसला तरी त्यामुळे भारताची चिंता वाढली आहे.

हिंदी महासागरातील 'दिएगो गार्सिया' हा केवळ एक लष्करी तळ नाही, तर जागतिक सामरिक समीकरणांचा केंद्रबिंदू आहे. अमेरिकेच्या दृष्टीने हा तळ आशिया, पश्चिम आशिया आणि आफ्रिका या तिन्ही भागांमध्ये शक्ती प्रक्षेपणासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. अशा तळावर इराणकडून अलिकडे हल्ला होण्याच्या घटनेकडे केवळ दोन देशांमधील संघर्ष म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. या घटनेचे पडसाद भारतासह संपूर्ण हिंदी महासागर परिसरात उमटू शकतात. हिंदी महासागर हा भारताच्या व्यापाराचा मुख्य मार्ग आहे. भारताचे जवळपास ८० टक्के खनिज तेल समुद्री मार्गाने येते. या भागात तणाव वाढल्यास ऊर्जा सुरक्षेवर थेट परिणाम होऊ शकतो. दुसरे म्हणजे या प्रदेशातील लष्करीकरण वाढण्याची शक्यता आहे. अमेरिकेचा तळ लक्ष्य झाल्यानंतर या भागात अमेरिका आपल्या उपस्थितीत वाढ करेल, तर इराण आपल्या प्रतिकारक्षमतेचे प्रदर्शन करेल. यामुळे महासागरातील तणाव वाढेल. तिसरे म्हणजे भारताच्या किनारपट्टीपासून तुलनेने जवळ असलेला हा भाग अस्थिर झाल्यास परदेशी गुप्तहेर, सायबर गुन्हेगार आणि दहशतवादी कारवायांचा धोका वाढू शकतो. या संपूर्ण घडामोडींमध्ये चीनची थेट नसली, तरी अप्रत्यक्ष अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. चीन गेल्या काही वर्षांमध्ये हिंदी महासागरात आपली उपस्थिती सातत्याने वाढवत आहे. 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' धोरणाद्वारे तो श्रीलंका, पाकिस्तान आणि आफ्रिकेतील बंदरांमध्ये गुंतवणूक करून आपली सामरिक पकड मजबूत करत आहे. या भागात अमेरिकेचा प्रभाव कमी झाला, तर चीनला अधिक मोकळीक मिळू शकते. अशा परिस्थितीत चीन इराणला राजनैतिक किंवा आर्थिक पाठिंबा देऊन आपले हितसंबंध पुढे नेऊ शकतो.

चीन-इराण ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि संरक्षण क्षेत्रात सहकार्य वाढवत आहेत. त्यामुळे इराणच्या कारवायांमागे चीनचा थेट हात नसला, तरी त्याला त्यातून धोरणात्मक फायदा मिळू शकतो. इराणने अलिकडेच दोन मध्यम पल्ल्याची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली; परंतु त्यापैकी एकही आपल्या लक्ष्यापर्यंत पोहोचले नाही. एक क्षेपणास्त्र हवेतच अयशस्वी झाले, तर दुसरे अमेरिकेच्या एका युद्धनौकेने एसएम-३ इंटरसेप्टरच्या साहाय्याने रोखले. इराणचा हा हल्ला अयशस्वी ठरला असला, तरी या घटनेमुळे भारतासमोर सुरक्षा आव्हाने निर्माण झाली.

'दिएगो गार्सिया' हे बेट इराणपासून अंदाजे तीन हजार आठशे ते चार हजार किलोमीटर अंतरावर आहे. आतापर्यंत इराणने आपल्या क्षेपणास्त्रांचा कमाल पल्ला दोन हजार किलोमीटर असल्याचा दावा केला होता; परंतु या बेटावर हल्ला करून त्यांनी आपल्या क्षेपणास्त्रांचा पल्ला यापेक्षा खूप जास्त असल्याचे दाखवून दिले आहे. इराणच्या खोरमशहर सारख्या क्षेपणास्त्रांचा पल्ला तीन हजार किलोमीटरपेक्षा जास्त असू शकतो. 'दिएगो गार्सिया' भारतापासून चार हजार किलोमीटर अंतरावर आहे. भारतीय लढाऊ विमाने हवेतच इंधन भरल्याशिवाय तिथे पोहोचू शकत नाहीत. तिथे पोहोचण्यापूर्वी भारतीय नौदलाला पाणबुडीविरोधी युद्धाच्या गंभीर धोक्याचाही सामना करावा लागेल.

भारतासाठी सर्वात मोठी चिंता इराणची हल्ला करण्याची क्षमता आहे. तांत्रिकदृष्ट्या संपूर्ण भारतीय मुख्य भूभाग आता इराणच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या टप्प्यात आला आहे. भारताची लष्करी आणि ऊर्जा पायाभूत सुविधा आता या नवीन 'धोका क्षेत्रात' आहे. भारत आपल्या खनिज तेल व गॅसच्या गरजांपैकी सुमारे ८० टक्के ऊर्जा सागरी मार्गाने आयात करतो. 'दिएगो गार्सिया'सारख्या सुरक्षित बंदरांवरील हल्ल्यांमुळे संपूर्ण प्रदेश आता एक सक्रिय युद्धक्षेत्र बनला आहे. या घडामोडीमुळे भारत एका अत्यंत गुंतागुंतीच्या राजकीय परिस्थितीत सापडला आहे. एकीकडे भारताचे इराणसोबत ऐतिहासिक आणि सामरिक संबंध आहेत, तर दुसरीकडे, हिंदी महासागरातील स्थैर्यासाठी भारत अमेरिका आणि ब्रिटनसोबत भागीदारी करतो. अनेक दशकांपासून 'दिएगो गार्सिया'ला हिंदी महासागरातील एक अभेद्य किल्ला मानले जात होते. हे 'सुरक्षित क्षेत्र' गमावल्यामुळे भारताला आता आपली नौदल आणि क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली अधिक मजबूत करावी लागेल.

संरक्षणतज्ज्ञांच्या मते भारताला आता हिंदी महासागरात आपली गस्त वाढवावी लागेल तसेच प्रादेशिक शक्तींसोबत नवीन संरक्षण युती करण्याचा विचार करावा लागेल. इराणने डागलेले क्षेपणास्त्र उत्तर कोरियाच्या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राच्या आधारावर विकसित केले गेले असल्याचे मानले जाते. प्रशांत महासागर आणि हिंदी महासागरातील भारताच्या सामरिक स्वातंत्र्यासाठी 'दिएगो गार्सिया' खूप महत्त्वाचे आहे. 'दिएगो गार्सिया'च्या संदर्भात भारत आणि अमेरिका यांच्यात संरक्षण विषयक सहकार्याचे संबंध राहिले आहेत. त्यामुळे असा धोका वाढल्यास भारताचे अमेरिकेवरील अवलंबित्व वाढेल, कारण अमेरिकेशिवाय भारत चीनच्या विस्तारवादावर पाळत ठेवू शकत नाही. 'अग्नी'सारखी लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे 'दिएगो गार्सिया'पर्यंत पोहोचण्यास सक्षम आहेत; परंतु ती अण्वस्त्र प्रतिबंधासाठी तयार केली आहेत. तटबंदीयुक्त लष्करी पायाभूत सुविधांवर अचूक पारंपरिक हल्ल्यांसाठी नाहीत. 'दिएगो गार्सिया'मध्ये अमेरिकेची लष्करी मालमत्ता आहे. त्यात विमानवाहू स्ट्राइक गट, पॅट्रियट/थाड श्रेणीच्या हवाई संरक्षण प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक युद्धक्षमता यांचा समावेश आहे. ते बहुतेक पारंपरिक हल्ले निष्प्रभ करू शकतात. शिवाय अमेरिकन आणि ब्रिटिश आण्विक पाणबुड्या या पाण्यात नियमितपणे जा-ये करत असतात. कोणत्याही भारतीय नौदल टास्क फोर्सला हल्ला करण्याच्या टप्प्यात पोहोचण्यापूर्वीच पाणबुडीविरोधी युद्धाच्या गंभीर धोक्याला सामोरे जावे लागेल. ब्रिटन आणि युरोप दोघेही इराणसोबतच्या या युद्धात थेट सहभागी होण्यास संकोच करत आहेत; पण इराणच्या 'दिएगो गार्सिया'वरील क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे ही परिस्थिती बदलेल. ताज्या हल्ल्यामुळे ब्रिटनला अमेरिकेच्या छत्राखाली यावे लागेल. इराणच्या हल्ल्यामुळे युरोपला आपले लष्करी तळ सुरक्षित नाहीत, असाही संकेत मिळतो. अमेरिका आणि ब्रिटन यांच्यातील 'विशेष संबंध' इतके घट्ट आहेत, की अमेरिकेच्या कोणत्याही मोठ्या लष्करी कारवाईमध्ये ब्रिटनची तटस्थता जवळपास अशक्य आहे. 'नाटो'च्या चौकटीत, गुप्त माहितीची देवाणघेवाण आणि लष्करी समन्वय आपोआप कार्यान्वित होतात. ब्रिटन हा 'फाइव्ह आईज'या गुप्त माहितीच्या देवाण घेवाणीच्या आघाडीचा एक अविभाज्य भाग आहे. इराणशी संबंधित कोणत्याही संघर्षात अमेरिकेला गुप्त माहिती देणे त्याला करारानुसार बंधनकारक आहे, मग ब्रिटिश पंतप्रधान कीथ स्टार्मर यांची तशी इच्छा असो वा नसो. 'दिएगो गार्सिया' हा हिंदी महासागरातील एक ब्रिटिश प्रदेश आहे, जो अमेरिकेला भाडेतत्त्वावर दिला आहे. पश्चिम आशियातील अमेरिकेच्या कोणत्याही हवाई कारवाईमध्ये या तळाचा वापर केला जातो. त्यामुळे ब्रिटन आपोआपच एक सहभागी बनतो. या परिस्थितीत इराणचा हल्ला अमेरिका-ब्रिटनपेक्षाही भारतासाठी चिंतेचा विषय आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



**महिलांमध्ये ऑर्गेज्मला उत्तम बनवू शकतो गांजा (भांग) : स्टडी**-स्टडीमध्ये ही गोष्ट समोर आली आहे की ज्या महिलांनी सेक्सच्या आधी मारिजुआना अर्थात गांजेचा वापर केला होता त्यांना दुप्पट ऑर्गेज्म जाणवले त्या महिलांच्या तुलनेत ज्यांनी गांचेचा वापर केला नव्हता. स्टडीमध्ये सामील संशोधकांनी सांगितले की अमेरिकेत वयस्करांमध्ये गांजेचा वापर वाढला आहे कारण अमेरिकेच्या बर्याच राज्यांमध्ये कायदा मंजूर करून गांजेला मेडिकल वापर सोबतच मौज-मस्तीसाठी वापरण्याची परवानगी दिली आहे.

## २ Joke विनोद




ङ्गबाबा, बाबाफ, चिंटू आपले इतिहासाचे पुस्तक नाचवत बाबांना म्हणाला.
ङ्गबाबा, या प्रश्नाचे उत्तर सांगा ना !
ङ्गबोल.
असे कोण कोणाला म्हणाले, ङ्गअजून लढाईला तोंड लागलेले नाहीफ चिंटूने विचारले.ङ्गमला नक्की सांगता येणार नाही पण बहुतेक ती नुकतीच लग्न झालेल्या पुरुषाची बायको असावी.

## ३ Message संदेश




Main ChandraMukhi
Tu , SurajMukhi
Main Tujhse Dukhi
Tu , Mujhse Dukhi
To phir Ek Kaam kar
Bulding se Kood Ja..
Tu
B Sukhi
Main B Sukhi..

## ४ Thought सुविचार




शक्तीपेक्षा सहनशक्तीने अधिक कामे होतात.
- अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

अमित्रो न विमोक्तव्य: कृपणं बह्वपि ब्रुवन्
कृपा न तास्मिन्कर्तव्या हन्यादेवापकारिनम्
(आदिपर्व, अध्याय १४०, ेक २२, महाभारत)
अर्थ - शत्रू अत्यंत दीनवाणीने बोलू लागला तरी त्याला मोकळा सोडू नये. त्याच्यावर दया न दाखविता त्याला ठार मारावे.

# समाचार मनोरंजक महाशब्दकोड्यांचा



## आडवे शब्द

१. लढाईतील अस्त्र
४. बहुरूपी
७. जगण्याला गती देणारा पुरातन शोध
९. धंदा
१०. विवाहितेचे घर
१२. लक्ष्मीचे एक नाव
१३. ढगांचा आवाज
१६. ऐटबाट
१८. मार्गक्रमण
१९. सोन्याचांदीचा धागा
२१. लौकिक जग
२२. क्रीडा
२३. शाहिरी गीत
२५. दिवसाचा चोविसावा भाग
२७. दणकट
३०. हाकेला उत्तर
३१. दारावरील खुणेचा आवाज
३२. पुष्कळ
३३. बेहोशीचा आणि अति जागरणचाही परिणाम
३६. विनोबाजींची समोकी गीता
३९. रोखलेली नजर
४०. फसविले जाणे
४२. होडी
४३. शरीरातील वात दूर करणारा
४५. सर
४७. लोखंड घासण्याचे हत्यार
४९. वेळ, मृत्यू
५०. तत्काळ, जागीच
५२. सामन्यातील पराक्रमी
५३. तंबूची कापडी भिंत
५४. तोरा, पत, अब्रू
५५. इंद्रिय
५६. उमटलेली प्रतिक्रिया
५८. पण करणे, अवघड काम तडीस नेण्याचा निश्चय करणे (वा.प्र.)
६१. वेदना, त्रास
६३. मरुत, वाहणारी हवा
६४. टोळीचा प्रमुख
६६. नकारच्या विरुद्ध
६८. धनी
७०. एक लहान गड्डा भाजी
७४. खराब,७६. रंग
७७. धातूचा धागा
७८. कलावंत
७९. प्रतिकूल परिणाम होणे, त्रास होणे

## उभे शब्द

१. नसती उठाठेव करणारा
२. पाण्यावरील हलकीशी लाट
३. खराब
४. नेहमी नशा करणारा
५. बांगड्यांचा व्यवसाय करणारा
६. फळातील द्रव
७. मोटार, बस इ.
८. जास्तीत जास्त
९. पंचामृतातील फळ
११. कणीदार
१४. भित्रा
१५. हातोहात, चपळाईने
१७. बोलगाणे
२०. आई
२२. पादत्राण
२४. हिरवा ताजा मसाला
२६. फळांचे पेय
२८. धागा तयार करण्याची प्रक्रिया
२९. उदर
३१. प्रफुल्लित
३४. पालवीचा ऋतू
३५. औषधाची मात्रा
३७. चंद्र
३८. अजाणता
४०. तऱ्हतऱ्हेची फळे
४१. चाळणी अशी असते
४३. दिवस
४४. कप्पा, खण
४५. केशतेलातील सुगंधी वनस्पती
४६. जेमतेम
४८. कोरी
५१. बेडकांचे पर्जन्यगीत
५३. आच्छादन, आवरण
५४. विहीर
५६. पालव, साडीचा शेवटचा भाग
५७. करूणा, कीव
५८. उगीच,
५९. खडा
६०. जलद व चपळाईने हालचाल करणे
६२. वृक्ष
६३. काळ्या तोंडाचे माकड
६४. मनाला लागलेली टोचणी
६५. यजमान, पती
६७. रहित
६९. कान
७१. वेल
७२. चंद्राची कड
७३. स्वर
७५. झाकणाचे पात्र

## आडवे उत्तर

१.ढाल तलवार ४.नकलाकार ७.चाक ९.पेशा १०.सासर १२.रमा १३.गडगडाट १६.रुबाबदार १८.वाटचाल १९.जर २१.जड २२.खेळ २३.पोवाडा २५.तास २७.बळकट ३०.ओ ३१.टकटक ३२.रगड ३३.तारवटणे ३६.गीताई ३९.टक ४०.फसगत ४२.तर ४३.वातहारक ४५.माळ ४७.कानस ४९.काळ ५०.तडकाफडकी ५२.सामनावीर ५३.कनात ५४.आब ५५.अवयव ५६.पडसाद ५८.विडा उचलणे ६१.यातना ६३.वारा ६४.सरदार ६६.रुकार ६८.मालक ७०.नवलकोल ७४.रद्दड ७६.वर्ण ७७.तार ७८.कलाकार ७९.बाधणे

## उभे उत्तर

१.ढालगज २.तरंग ३.वाईट ४.नशाबाज ५.कासार ६.रस ७.चारचाकी ८.कमाल ९.पेरु ११.रवाळ १४.डरपोक १५.डाकोडाक १७.बडबडगीत २०.माता २२.खेटर २४.वाटण २६.सरबत २८.कताई २९.पोट ३१.टवटवीत ३४.वसंत ३५.डोस ३७.तारकानाथ ३८.नकळत ४०.फळफळावळ ४१.गळकी ४३.वासर ४४.रकाना ४५.माका ४६.कसाबसा ४८.नवी ५१.डरावडराव ५३.कवच ५४.आड ५६.पदर ५७.दया ५८.विनाकरण ५९.उभा ६०.लवलवणे ६२.तरु ६३.वानर ६४.सल ६५.दादला ६७.रद्द ६९.कर्ण ७१.लता ७२.कोर ७३.सूर ७५.डबा



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### गिलच्या दुखापतीमुळे गुजरात टायटन्सच्या चिंतेत वाढ

**मुंबई** –गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल आयपीएल २०२६ च्या राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सामन्यात खेळू शकला नाही. त्याच्या अनुपस्थितीमुळे संघाला पराभव स्वीकारावा लागला. जर तो राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सामन्यात संघात असता, तर निकाल कदाचित वेगळा लागला असता. सामना संपला आहे आणि संघ पुढील सामन्यावर लक्ष केंद्रित करत आहे. पण चाहत्यांना अजूनही एक प्रश्न पडला आहे की, गिल मैदानावर कधी परतणार?.सध्या सुरू असलेल्या आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सचा तिसरा सामना ८ एप्रिल २०२६ रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध होणार आहे.

### ४३ वर्षीय गोलंदाजाचा कहर

**नवी दिल्ली**–दिग्गज गोलंदाज जेम्स अँडरसन २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला. हा दिग्गज इंग्लिश खेळाडू आता ४३ वर्षांचा आहे आणि काही महिन्यांत तो ४४ वर्षांचा होईल. मात्र, या वयात तो अजूनही देशांतर्गत क्रिकेट खेळत आहे. तो केवळ खेळतच नाहीये, तर उत्कृष्ट कामगिरीही करत आहे. कसोटी सामन्यांमध्ये ७०० हून अधिक बळी घेणारा जेम्स अँडरसन सध्या काउंटी क्रिकेट खेळत आहे. तो केवळ लँकेशायरकडून खेळतच नाही, तर संघाचे कर्णधारपदही भूषवत आहे.
या सामन्याच्या पहिल्या डावात त्याने शानदार गोलंदाजी केली.जेम्स अँडरसनने घेतले पाच विकेट : हे लक्षात घ्यावे की काउंटी क्रिकेट हंगाम गेल्या शुक्रवारी (३ एप्रिल) सुरु झाला. लँकेशायरचा सामना नॉर्थम्प्टनशायरशी होत आहे. या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी जेम्सने शानदार गोलंदाजी केली.

### बांगलादेश क्रिकेट बोर्डात खळबळ, तीन संचालकांचा राजीनामा

**दिल्ली**–बांगलादेश क्रिकेट बोर्डात (बीसीबी) गोंधळाचे वातावरण आहे. ढाका येथे झालेल्या प्रदीर्घ संचालक मंडळाच्या बैठकीनंतर काही तासांतच बीसीबीच्या तीन संचालकांनी राजीनामा दिला. बैठकीनंतर लगेचच फय्याझुर रहमान यांनी आपल्या निर्णयाची माहिती मंडळाला दिली, तर त्यानंतर थोड्याच वेळात शानियान तनिम आणि मेहराब आलम चौधरी यांनीही राजीनामा दिला. यामुळे बीसीबीच्या निवडणुकांनंतर सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीत राजीनामा देणाऱ्या संचालकांची एकूण संख्या सहा झाली आहे.या वर्षी जानेवारीमध्ये इश्तियाक सादिक यांनी वैयक्तिक कारणांचा हवाला देत सर्वप्रथम राजीनामा दिला होता.

### बिश्नोईच्या फिरकीत अडकले गुजरातचे टायटन्स

**अहमदाबाद**–येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झा–लेला गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील सामना आयपीएल २०२६ मधील सर्वात रोमांचक सामन्यांपैकी एक ठरला. राजस्थाननं सामन्याच्या शेवटच्या चेंडूवर ६ धावांनी विजय मिळवला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सने ६ गडी गमावून २१० धावा केल्या. शेवटच्या षटकात विजयासाठी ११ धावांची गरज असताना, गुजरातनं ४ धावा केल्या. तु–षार देशपांडेनं केवळ चार धावा देऊन राजस्थान रॉयल्सला विजय मिळवून दिला. यासह गुजरातला ८ गडी गमावून केवळ २०४ धावा करता आल्या.

### ३५ वर्षांच्या शमीचा सापळा, अभिषेक अलगद अडकला, पंत पाहतच राहिला!

हैदराबाद–आयपीएल २०२६ मध्ये लखनऊविरुद्धच्या सामन्यात हैदराबादला सुरूवातीलाच मोठे धक्के बसले आहेत. या सामन्यात लखनऊचा कर्णधार ऋषभ पंतने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला. यानंतर पहिल्याच ओव्हरच्या शेवटच्या बॉलला मोहम्मद शमीने अभिषेक शर्माला अलगद सापळ्यात अडकवला. यानंतर मोहम्मद शमीने त्याच्या पुढच्याच ओव्हरच्या पहिल्या बॉलला ट्रेव्हिस हेडचीही विकेट घेतली. शमीने पहिल्या २ विकेट घेतल्यानंतर प्रिन्स यादवने इशान किशनला बोल्ड केले.

## सीएसकेच्या पराभवाची हॅटट्रिक!

# आरसीबी ने ४३ धावांनी विजय मिळवत गुणतालिकेत गाठलं अव्वल स्थान





**नवी दिल्ली:** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ४३ धावांनी विजय मि ळवला आहे. ठेूरश्र उहरश्र–श्रशपस–शीं इशपसर–श्रींीि ीं उहशपरळ डींशिी घळपसी: रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने चेन्नई सुपर किंग्ज संघाविरुद्ध खेळताना विजयाचा चौकार मारला आहे. गेल्या तिन्ही सामन्यात चेन्नई सुपर किंग्ज संघाला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. स्पर्धेतील ११ वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने चेन्नईसमोर विजयासाठी २५१ धावांचे भलेमोठे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना चेन्नईल २०७ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह बंगळुरूने हा सामना ४३ धावांनी जिंकून सलग दुसरा विजय मिळवला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने चेन्नई सुपर किंग्ज संघासमोर विजयासाठी २५१ धावांचे आव्हान ठेवले होते. या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना चेन्नई सुपर कर्किंग्ज संघाला चांगल्या सुरुवातीची गरज होती. पण हवी तशी सुरुवात मिळाली नाही. संजू सॅमसन अवघ्या ९ धावा करून माघारी परतला. तर ऋतुराज गायकवाड ७ धावांवर माघारी परतला. गेल्या सामन्यातील अर्धशतकवीर आयुष म्हात्रे या सामन्यात १ धाव करून माघ–ारी परतला.

सुरुवातीचे ३ फलंदाज स्वस्तात माघारी परतल्यानंतर सर्फराज खानने संघाचा डाव सांभाळला. त्याने २५ चेंडूत ८ चौकार आणि २ षटकारांचा साहाय्याने ५० धावांची खेळी केली. कार्तिक शर्मा अवघ्या ६ धावांवर माघारी परतला. तर शिवम दुबे १८ धावांवर बाद झाला. युवा फलंदाज प्रशांत वीरने आपल्या फलंदाजीने सर्वांचं मन जिंकलं. त्याने २९ चेंडूत ४३ धावा केल्या. तर जेमी ओव्हरटनने १६ चेंडूत ३७ धुवा केल्या. शेवटी अंशूल कंबोज १९ धावांवर नाबाद राहिला. पण चेन्नई सुपर किंग्ज संघाचा डाव २०७ धावांवर आटोपला. यासह रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने हा सामना ४३ धावांनी आपल्या नावावर केला.

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने उभारला २५० धावांचा डोंगर**

या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून फिल सॉल्टने ४६ धावांची खेळी केली. तर विराट कोहलीने २८ धावा केल्या. देवदत्त पडिक्कलने ५० धावा केल्या. रजत पाटीदारने नाबाद ४८ धावांची खेळी केली. तर टीम डेव्हिडने नाबाद ७० धावांची खेळी केली.



## तुषार देशपांडेने घेतला बदला, शेवटच्या ओव्हरला थरारक विजय

मुंबई–इंडियन प्रीमियर लीगच्या १९ व्या सीजनमधील नववा सामना हा राजस्थान रॉयल्स विरुद्ध गुजरात टायटन्स यांच्यात ४ एप्रिल रोजी खेळवला गेला. राजस्थान रॉयल्स ने या सामन्यात शेवटच्या ओव्हरला थरारक विजय मिळवला. गुजरातला शेवटच्या ओव्हरमध्ये ११ धावांची आवश्यकता असताना गोलंदाज तुषार देशपांडेने त्याच्या ओव्हरला राशीद खानची एक महत्वाची विकेट घेतली आणि त्यासह फक्त ४ धावा देऊन गुजरात टायटन्सवर ६ धावांनी थरारक विजय मिळवला. यावेळी विजयापेक्षा जास्त तुषार देशपांडेने केलेल्या सेलिब्रेशनचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत–ोय. यापूर्वी राशिद खानने तुषार देशपांडे विरुद्ध खेळताना मागच्या सीजनमध्ये असे सेलिब्रेशन केले होते. त्यामुळे यावेळी तुषार देशपांडेने तसं सेलिब्रेशन करून राशिद खानला डिवचलं.

**'दिस इज माय टर्फ' सेलिब्रेशन :** आयपीएल २०२५ च्या सीजनमध्ये राजस्थान रॉयल्स विरुद्ध खेळताना कगिसो रबाडा आणि राशिद खान यांनी गुजरात टायटन्सला शेवटच्या बॉलवर विजय मिळवून दिला होता. यावेळी तुषार देशपांडे गोलंदाजी करत होता आणि राशिद खानने त्याच्या बॉलवर चौकार मारून शेवटच्या बॉलवर २ धावांची आवश्यकता असताना सामना जिंकवून दिला होता. त्यानंतर राशिदने मैदानाच्या दिशेने इशारा करून 'दिस इज माय टर्फ' असं सेलिब्रेशन केलं होतं. हेच सेलिब्रेशन तुषार देशपांडेने शनिवारी राजस्थान रॉयल्स विरुद्ध सामना जिंकल्यावर केलं.

**तुषार आणि राशिदचा व्हिडीओ व्हायरल :** राजस्थान रॉयल्स विरुद्ध गुजरात टायटन्स यांच्यात सामना झाल्यावर सोशल मीडियावर तुषार देशपांडे आणि राशिद खान यांचा व्हिडीओ व्हायरल होतोय. यातील एका व्हिडिओत राशिद खानचा आयपीएल २०२५ मधील 'दिस इज माय टर्फ' सेलिब्रेशन आहे. तर दुसऱ्या बाजूला आयपीएल २०२६ मध्ये शनिवारी झालेल्या सामन्यात तुषार देशपांडेने केलेलं सेलिब्रेशन आहे. तुषार देशपांडेने ३ ओव्हरमध्ये केवळ २४ धावा देऊन १ विकेट घेतली.

**राजस्थान रॉयल्स पॉईंट्स टेबलमध्ये टॉपवर :** राजस्थान रॉयल्सने आतापर्यंत १९ व्या सीजनमध्ये झा–लेले दोन्ही सामने जिंकले असून यामुळे त्यांचे पॉईंट्स टेबलमध्ये ४ पॉईंट्स झाले असून यात त्यांचा नेर रन रेट +२.२३३ आहे. यासह आयपीएल पॉईंट्स टेबलमध्ये राजस्थान नंबर १ च्या स्थानी आहे. राजस्थान रॉयल्सने गुजरातला प्रथम फलंदाजी करून २११ धावांचे आव्हान दिले होते, हे आव्हान पूर्ण करण्यात गुजरात अपयशी ठरली आणि ६ धावांनी राजस्थानचा विजय झाला. राजस्थान नंबर १ वर पोहोचल्यामुळे दिल्ली कॅपिटल्सचा संघ हा +१.१७० च्या नेट रन रेटने दुसऱ्या स्थानावर आहे.

## १५७ धावा करता–करता एलएसजीच्या नाकात दम; पंतच्या खेळीन जिंकले

हैदराबाद–आयपीएल २०२६ च्या १० व्या सामन्यात, लखनऊ सुपर जायंट्सनं सनरायझर्स हैदराबादला ५ गडी राखून पराभूत केलं. प्रथम फलंदाजी करताना सनरायझर्स हैदराबादनं १५६ धावा केल्या. प्रत्युत्तरात, लखनऊ संघानं शेवटच्या षटकापर्यंत ५ गडी गमावून लक्ष्याचा पाठलाग केला. लखनऊचा या हंगामातील हा पहिलाच विजय आहे, तर सनरायझर्सचा तीन सामन्यांतील हा दुसरा पराभव आहे. सामन्यात खराब फॉर्मशी झगडत असलेल्या लखनऊचा कर्णधार ऋषभ पंतनं लक्ष्याचा पाठलाग करताना शानदार अर्धशतक झळकावलं. पंतनं डावाची सुरुवात न करता तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्यानं ४३ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं.

**हैदराबादनं ३५ धावांत गमावले ४ गडी :** तत्पुर्वी मोहम्मद शमीच्या प्रभावी सलामीच्या गोलंदाजीनंतर, हेनरिक क्लासेन आणि नितीश कुमार रेड्डी यांच्यातील आक्रमक शतकी भागीदारीच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादनं ९ गडी गमावून १५६ धावा केल्या होत्या. विशेष म्हणजे पहिल्या १० षटकांत ३५ धावांत चार गडी गमावल्यानंतर संघर्ष करणाऱ्या हैदराबाद संघाला क्लासेन (४१ चेंडूंत ६२ धावा) आणि रेड्डी (३३ चेंडूंत ५६ धावा) यांनी संघाला सावरलं. या दोन फलंदाजांनी ६३ चेंडूंत पाचव्या विकेटसाठी विक्रमी ११६ धावांची भागीदारी करताना सात षटकार ठोकले.

**मोहम्मद शमीची घातक गोलंदाजी :** क्लासेन आणि रेड्डी दोघं झटपट बाद झाल्यानंतर, लखनऊनं सामन्यावर पुन्हा नियंत्रण मिळवलं आणि यजमान संघाला १६० धावांच्या आत रोखण्यात यश मिळवलं. तत्पूर्वी, शमीनं चार षटकांत केवळ ९ धावा देत १८ निर्धाव चेंडू टाकून दोन बळी घेतले आणि हैदराबादची अव्वल फलंदाजी पूर्णपणे उद्ध्वस्त केली. त्याच्या गोलंदाजीदरम्यान, आघाडीचे फलंदाज ट्रॅव्हिस हेड (७), अभिषेक शर्मा (०) आणि कर्णधार इशान किशन (१) स्वस्तात बाद झाले.

**हैदराबादच्या फलंदाजांचा संघर्ष :** आक्रमक फलंदाज लियाम लिव्हिंगस्टोनसुद्धा लखनऊचा कर्णधार ऋषभ पंतच्या उत्कृष्ट यष्टीरक्षणाचा बळी ठरला. डावाच्या ११व्या ते १५व्या षटकांदरम्यान सामन्याचं पारडं फिरल्यासारखं वाटलं, जेव्हा



सनरायझर्सनं पाच षटकांत ७९ धावा केल्या. लेग–स्पिनर दिग्वेश राठी, ज्यानं आपल्या पहिल्या दोन षटकांत केवळ १० धावा दिल्या होत्या, त्यानं पुढच्या दोन षटकांत ३६ धावा दिल्या.
भारतीय वेगवान गोलंदाज आवेश खान आणि प्रिन्स यादव सुरुवातीच्या षटकांमध्ये प्रभावी वाटत होते, पण नंतर त्यांचा टप्पा आणि दिशा चुकली, ज्याचा क्लासेन आणि रेड्डी यांनी पुरेपूर फायदा घेतला. पहिल्या १० षटकांत केवळ एक षटकार आणि एक चौकार मारला गेला असताना, या जोडीनं सात षटकार आणि आठ चौकार ठोकले.

# हा पराभव माझ्या चुकीमुळे:, ऋतुराजने स्वत:वर फोडलं सीएसकेच्या पराभवाचं खापर

**नवी दिल्ली:** चेन्नई सुपर किंग्सच्या आयपीएल २०२६ मध्ये चेन्नई सुपर किंग्स संघाने पराभवाची हॅटट्रिक केली आहे. ५ एप्रिलला चिन्नास्वामी स्टेडियममध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळूरविरुद्ध सीएसकेला ४३ धावांनी पराभव पत्करावा लागला. २५१ धावांचं डोंगराएवढं मोठं लक्ष्य गाठण्यात चेन्नईचा संघ अपयशी ठरला. सलग तीन पराभवांमुळे सीएसकेचा कर्णधार ऋतुराज गायकवाड खूप निराश झाला होता, पाहूया नेमकं काय म्हणाला?आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ३ बाद २५० धावांचा डोंगर उभारला. आरसीबीच्या टॉप–५ फलंदाजांनी यामध्ये सर्वात मोठं योगदान दिलं. तर अखेरच्या षटकांमध्ये टीम डेव्हिडने २५ चेंडूत ७० धावांचं योगदान दिलं. तर प्रत्युतरात चेन्नईच्या संघाने सुरूवात चांगली केली, पण सर्व फलंदाजांनी ठराविक अंतराने सातत्याने विकेट गमावल्या. परिणामी सीएसकेचा संघ १९.४ षटकांत २०७ धावांवर सर्वबाद झाला आणि आरसीबीने ४३ धावांनी सामना जिंकला. सामन्यानंतरच्या सादरीकरणादरम्यान, ऋतुराज गायकवाडने सीएसकेच्या फलंदाजीच्या अपयशावर भाष्य केलं. त्याने पराभवासाठी स्वतः ला जबाबदार धरलं आणि सांगितले की, जर त्याने जबाबदारी घेऊन



फलंदाजी केली असती, तर २५१ धावांचं लक्ष्य गाठता आलं असतं. ऋतुराज एक षटकार लगावत अवघ्या ७ धावांवर बाद झाला. ऋतुराज गायकवाड चेन्नईच्या पराभवानंतर नेमकं काय म्हणाला?ऋतुराज म्हणाला, ङ्गजर मी थोडं अधिक योगदान दिलं असतं, तर निकाल कदाचित वेगळा असता. हे माझ्या चुकीमुळे घडलं. आम्ही २०० धावांचा टप्पा ओलांडला याचं मला आश्चर्य वाटतं. सर्फराझ, प्रशांत, जेमी आणि शिवम दुबे यांनी उत्कृष्ट प्रयत्न केले. जर मी सुरुवातीला अधिक चांगला खेळलो असतो, तर आम्ही लक्ष्याचा पाठलाग करू शकलो असतो.सुरूवातीपासून सामना सीएसकेच्या नियंत्रणात होता. १५ षटकांत आरसीबीची धावसंख्या ३ गडी बाद १५१ होती. त्यानंतर टीम डेव्हिड आणि रजत पाटीदार यांनी ३१ चेंडूंमध्ये ९९ धावा जोडल्या. १८ व्या षटकात अंशुल कंबोजने डेव्हिडला बोल्ड केलं, पण दुर्दैवाने तो नो–बॉल ठरला. आरसीबीने संधी साधली आणि २५१ धावांचा डोंगर उभा केला. सीएसकेचा कर्णधार अंशुल कंबोजच्या त्या चेंडूबाबत बोलताना म्हणाला, ङ्गअंशुल कंबोजने त्याला बाद केलं. तो नो–बॉल ठरला आणि त्यानंतर डेव्हिडने फटकेबाजी सुरू केली,याचं श्रेय डेव्हिडला जालं. १३व्या किंवा १४व्या षटकापर्यंत सामना आमच्या नियंत्रणात होता, पण त्यानंतर सर्व काही बदललं.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात पायाभूत सुविधांना मोठी चालना

## अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत प्रवासी सुविधा आणि सुलभता वाढवण्यासाठी ₹४८० कोटींहून अधिक गुंतवणूक

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग, अमृत भारत स्टेशन योजना आणि संबंधित कामांअंतर्गत ₹४८० कोटींहून अधिक एकत्रित गुंतवणुकीसह पायाभूत सुविधांच्या विकासाच्या एका परिवर्तनात्मक टप्प्यातून जात आहे. या उपक्रमांचा उद्देश विभागातील प्रवाशांचा अनुभव उंचावणे, सुलभता वाढवणे आणि स्थानकांच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करणे हा आहे.

एबीएसएस टप्पा-१ अंतर्गत स्थानकनिहाय विकास (₹३३०.१४ कोटी) विभागातील प्रमुख स्थानकांचे आधुनिक सोयीसुविधा आणि सुधारित प्रवासी सुविधांसह सर्वसमावेशकपणे आधुनिकीकरण केले जात आहे:

– सोलापूर: मोठ्या प्रमाणावर पुनर्विकास, ज्यामध्ये फिरण्याच्या जागेचा विस्तार (९,४०० चौ.मी. पेक्षा जास्त), प्लॅटफॉर्मचे पृष्ठभागीकरण, ३० पिण्याच्या पाण्याची बूथ, बुकिंग ऑफिससह दुसऱ्या प्रवेशद्वाराचा विकास, कॅनोपी आणि एफओबीपर्यंत दिव्यांग-अनुकूल रॅम्प यांचा समावेश आहे.

– कलबुर्गी: स्थानक आणि व्हीआयपी प्रवेशद्वाराचे आधुनिकीकरण, फिरण्याची जागा आणि पार्किंगमध्ये सुधारणा, आधुनिक शौचालये आणि १२ मीटर रुंदीचा नवीन मध्यवर्ती एफओबी.



– लातूर: दर्शनी भाग, पार्किंग आणि फिरण्याची जागा, ड्रेनेज, कॉनकोर्स, सीमा भिंत, कॅनोपी यांचा विकास आणि २ एस्केलेटरची स्थापना.

– पंढरपूर: प्लॅटफॉर्मचा विस्तार, नवीन प्रतीक्षा कक्ष आणि बुकिंग ऑफिस, संरचनांचे स्थलांतर आणि १२ मीटर रुंदीच्या एफओबीचे बांधकाम.

– वाडी: प्रतीक्षागृहांचे नूतनीकरण, सुशोभीकरण, सुधारित जलनिःसारण व्यवस्था, आणि पादचारी पूल व सशुल्क शौचालयांचे बांधकाम.

– कुर्डुवाडी: पादचारी पुलासह येण्या-जाण्याच्या जागेचा विकास, सीमाभिंत, प्लॅटफॉर्मवरील निवारा आणि जलनिःसारण प्रणाली. – धाराशिव: स्थानकाच्या दर्शनी भागाची सुधारणा, पार्किंग, प्लॅटफॉर्मचे पृष्ठभागीकरण, आणि पादचारी पुलाचे बांधकाम.

– जेउर: दिव्यांगजनांसाठी रॅम्प, प्रतीक्षागृहातील फर्निचर आणि पादचारी पुलासह प्रवासी-केंद्रित सुधारणा.

– गाणगापुर रोड: सुशोभीकरण, नमुना शौचालये, प्लॅटफॉर्मचे पृष्ठभागीकरण, आणि पादचारी पुलासह सुधारित येण्या-जाण्याची व्यवस्था.

– शहाबाद: दर्शनी भाग, सीमाभिंत, नमुना शौचालये आणि पादचारी पुलाच्या पायाभूत सुविधांचा विकास.

– दुधानी: प्रतीक्षागृहांचे नूतनीकरण, प्लॅटफॉर्मचे पृष्ठभागीकरण आणि पादचारी पुलाच्या बांधकामासह सर्वसमावेशक पुनर्विकास.

– अक्कलकोट रोड: प्रवाशांची सोय वाढवण्यासाठी लक्षित पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा.

टप्पा- अंतर्गत स्थानकनिहाय सुधारणा (₹१५२.३५ कोटी) टप्पा- मध्ये सर्वसमावेशकता आणि शाश्वततेवर भर देत पायाभूत सुविधा आणखी बळकट केल्या जात आहेत:

– सोलापूर: प्लॅटफॉर्मवरील निवारे, दिव्यांग-स्नेही स्वच्छतागृहे व स्पर्शक्षम मार्गिका, पाणीपुरवठा यंत्रणा (३.५ लाख लिटर क्षमता), निचरा व्यवस्थेतील सुधारणा आणि पदपथांचा विकास.

– कलबुर्गी: विश्रामगृहांची भर, दिव्यांगांसाठीच्या सुविधा आणि स्थानक परिसरातील व निवारा क्षेत्रांचा विस्तार.

– लातूर: प्लॅटफॉर्मवरील निवारे, संरक्षक भिंती, दिव्यांगांसाठीच्या सुविधा आणि इमारतींची दुरुस्ती. – वाडी: स्थानक परिसराचा विस्तार, दिव्यांगांसाठीच्या सुविधा आणि निचरा व्यवस्थेतील सुधारणा.

– पंढरपूर: मोठ्या स्वरूपाच्या सुधारणा, ज्यामध्ये मोठे प्लॅटफॉर्म निवारे, वाहनतळ आणि स्थलांतर कामांचा समावेश आहे.

– कुर्डुवाडी: रस्ते, स्थानक परिसर, दिव्यांगांसाठीच्या सुविधा आणि निचरा व्यवस्थेचा व्यापक विकास.

– धाराशिव: प्रतीक्षागृहे, वाहनतळाच्या सुविधा आणि दिव्यांगांसाठीच्या पायाभूत सुविधा.

– दुधनी: प्लॅटफॉर्मवरील निवारे, स्थानक परिसराचे आधुनिकीकरण आणि प्रवाशांसाठीच्या सुधारित सुविधा.

– जेऊर: स्थानक परिसर आणि वाहनतळाचा विकास, तसेच दिव्यांगांसाठीच्या विशेष सुविधा.

– अक्कलकोट रोड: वाहनतळ, संरक्षक भिंती आणि सार्वजनिक सुविधांसह पायाभूत सुविधांचा विस्तार.

– गंगापूर रोड: प्रस्तावित कामे सध्या मंजुरीच्या टप्प्यावर आहेत.

– शहाबाद: बुकिंग हॉल, प्रतीक्षागृहे, कर्मचारी निवासस्थाने आणि प्लॅटफॉर्मच्या पृष्ठभागाचे व्यापक नूतनीकरण यांसारख्या मोठ्या सुधारणा.

प्रवाशांची सुरक्षा आणि सुलभता बळकट करणे

– भिगवण, होटगी, मलठन, बोरोटी, कुलाली, हरंगुळ, मुरुड, कळंब रोड, शेंद्री, जिंती रोड, पारवाडी आणि मोहोळ या स्थानकांवर १२ हाय-लेव्हल प्लॅटफॉर्म्स (उन्नत प्लॅटफॉर्म्स) मंजूर करण्यात आले आहेत.

– मलिकपेठ, अंगार, धोकी, आरग आणि कवठे महाकाळ येथे ५ अतिरिक्त हाय-लेव्हल प्लॅटफॉर्म्स प्रस्तावित आहेत.

– हरंगुळ, बोरीबेल, मलठान, मुंडवाडी, पाकणी आणि बाळे येथे ३ मीटर रुंदीचे ६ नवीन पादचारी पूल प्रस्तावित आहेत.

– लातूर येथे १ पादचारी पूल मंजूर करण्यात आला आहे.

या उपाययोजनांमुळे प्रवाशांची सुरक्षा, हालचालींमधील सुलभता आणि प्रवेशयोग्यता लक्षणीयरीत्या वाढेल; विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांसाठी याचा मोठा फायदा होईल. आधुनिक रेल्वे पायाभूत सुविधांसाठी कटिबद्धता सोलापूर विभाग खालील उद्दिष्टांच्या दिशेने सातत्याने प्रगती करत आहे:

– जागतिक दर्जाच्या स्थानक पायाभूत सुविधा

– सर्वसमावेशक आणि दिव्यांग-स्नेही सुविधा


– प्रवाशांच्या सोयीसुविधा आणि सुरक्षेत सुधारणा

– शाश्वत आणि भविष्यासाठी सज्ज अशा रेल्वे प्रणाली


सोलापूर विभागातील प्रत्येक स्थानकावर सुरू असलेला विकास हा एका समग्र आणि प्रवासी-केंद्रित परिवर्तनाचे दर्शन घडवतो; यामुळे भारतीय रेल्वेची आधुनिकीकरण आणि प्रादेशिक विकासाप्रती असलेली कटिबद्धता अधिकच दृढ होते. या उपक्रमांमुळे प्रवासाचा अनुभव लक्षणीयरीत्या उंचावेल, तसेच संपूर्ण विभागातील दळणवळण आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल.

# कराडच्या स्व. दिगंबर काशिनाथ पालकर प्रतिष्ठान चे विविध सामाजिक बांधिलकी पुरस्कार जाहीर

## सोलापूरचे कारीकर, मंद्रूपकर, आष्टीकर व पोतदार समाजरत्न पुरस्काराचे मानकरी



श्री. भारतराव कारीकर



मोहन मंद्रूपकर



संजय आष्टीकर



वसंत पोतदार

**सोलापूर/प्रतिनिधी :** प्रतिष्ठित स्व. दिगम्बर काशिनाथ पालकर प्रतिष्ठान कराडच्या वतीने विविध क्षेत्रात योगदान असलेल्या मान्यवारासाठी समाज रत्न, समाज भूषण, चित्र महर्षी आणि वृक्ष मित्र आदी सामाजिक बांधिलकी पुरस्कार जाहीर करण्यात आले असून सर्वश्री भारतराव कारीकर, मोहनराव मंद्रूपकर, संजय आष्टीकर आणि वसंत पोतदार सर्व सोलापूर यांना समाज रत्न, गोविंदराव थोरात आण्णा नडशी, रवींद्र बर्डे काका कासेगाव, दादासाहेब डोर्ले व सौ शुभांगी डोर्ले सातारा, सौ विनिता धर्माधिकारी पुणे, मकरंद नाईक कराड यांना समाजभूषण व सूर्यकांत बारसकर चेन्नई, दादासाहेब सुतार कराड यांना चित्र महर्षी आणि चंद्रकांत जाधव यांना वृक्ष मित्र आदी मान्यवर यंदाच्या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

श्री. भारत कारीकर यांनी त्यांच्या कार्यकाळात श्री संत नरहरी महाराज समाधी मंदिर पंढरपूर ची अनेक विकास कामे मार्गी लावली असून उपाध्यक्ष श्री. मोहन मंद्रूपकर व कार्यवाहक श्री. संजय आष्टीकर यांनी मंदिर व्यवस्थापन आणि भाविकांच्या सोयीसाठी मोठे योगदान दिले आहे. तसेच श्री. वसंत पोतदार यांनी सोनार समाज संस्थेच्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचून केलेले कार्य आदर्शवत आहे. कराड च्या भूमीत सोलापूर च्या या चारही सुपुत्रांचा गौरव होत असल्याबद्दल संपूर्ण सोनार समाजात आणि सामाजिक वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.

या निवडीबद्दल समाजात सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. हा पुरस्कार प्रदान सोहळा दि. १८ एप्रिल रोजी सकाळी साडे दहा वाजता श्री कृष्णाबाई मंगल कार्यालय ( नवीन ) सोमवार पेठ, कराड येथे कृष्णा विश्व विद्यापीठ कराड चे कुलपती तथा य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. शिवनगरचे अध्यक्ष मा श्री. सुरेशराव भोसले ( बाबा ) साहेब यांच्या अध्यक्षतेखाली , कृष्णा खोरे विकास महामंडळाचे माजी उपाध्यक्ष मा. श्री.आनंदराव पाटील ( नाना ), पुणे येथील ग्रामीण साहित्यिक मा. श्री. ब. ल. पोतदार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे.

# न्यूनगंड न बाळगता आत्मविश्वासाने पुढे चला : डॉ. संदीपान जगदाळे

## रोटरीकडून मूक-बधीर विद्यार्थिनींसोबत ईद स्नेह मिलन




**लातूर/प्रतिनिधी :** ''ऐकू किंवा बोलता येत नसले तरी आपल्या प्रतिभेच्या जोरावर प्रत्येकजण यशस्वी होऊ शकतो.'' दिव्यांग विद्यार्थ्यांनी न्यूनगंड न बाळगता आत्मविश्वासाने पुढे जावे असे आवाहन प्रा. संदीपान जगदाळे यांनी केले.

रोटरी क्लब लातूरच्या वतीने सौ. सुशिलादेवी देशमुख निवासी मूकबधीर विद्यालय, सिग्नल कॅम्प, लातूर येथील विद्यार्थीनींसाठी ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन गुरूवारी सायंकाळी करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष ज़की खान कायमखानी होते. त्यांच्या पुढाकारातूनच हा ईद स्नेह मिलन कार्यक्रम उत्साहात पार पडला. मंचावर प्रमुख पाहुणे जयसिंगराव देशमुख व धनंजय राव देशमुख हे होते.

यावेळी विद्यार्थिनींसोबत स्नेहसंवाद साधत फेलोशिपचा आनंद घेतला गेला. तसेच संस्थेतील महिला कर्मचाऱ्यांना साड्या देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान चित्रकला स्पर्धेत यश मिळवलेल्या मूक-बधीर विद्यार्थिनींना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी रो. डॉ. संदीपान जगदाळे यांनी प्रभावी मार्गदर्शन करत रोटरीच्या कार्याचा उद्देश, शांततेचे महत्त्व आणि एकत्रितपणे राहण्याची गरज यावर भाष्य केले. यावेळी त्यांनी सुधा चंद्रण व अरुणिमा सिन्हा यांच्या प्रेरणादायी उदाहरणांचा उल्लेख करून विद्यार्थिनींमध्ये नवी ऊर्जा निर्माण केली. डॉ. जगदाळे यांचे भाषण शिक्षक बंकट पवार यांनी संकेत भाषेत विद्यार्थिनींना समजावून सांगितले. या समरस आणि भावनिक क्षणाने उपस्थितांची मने भारावून गेली. हा कार्यक्रम सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

सूत्रसंचालन बंकट पवार यांनी केले. आभारप्रदर्शन रो. बाबुराव सोमवंशी यांनी केले. या प्रसंगी रोटरीचे सचिव विश्वनाथ निगुडगे, प्रोजेक्ट चेअरमन रो. बाबुराव सोमवंशी, रो.रामप्रसाद राठी, रो. उत्तरेश्वर हेरकर, रो. विलास जिल्हावर, रो. राजकुमार गिरवलकर रो. महेंद्र जोशी, रो. नरेश कोरे , सुधाकर कोटगिरे, नानिक जोधवानी यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थिती होते.

# जुहू, दहिसर, अंधेरीतील रखडलेला पुनर्विकास मार्गी लागणार

**मुंबई/प्रतिनिधी :** दरेकर अभ्यासगटाच्या एका महत्वपूर्ण शिफारशीची अंमलबजावणी होतेय, याचा विशेष आनंद आहे. यामुळे जुहू आणि डी.एन.नगर परिसरातील शेकडो इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा होईल, अशी प्रतिक्रिया रखडलेल्या पुनर्विकासाबाबत शासनाने नेमलेल्या दरेकर अभ्यासगटाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समुह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी दिली.

विमानपत्तन प्राधिकरणाने १८ मार्चला एक परिपत्रक काढले असून दहिसर व डी.एन.नगर परिसरातील इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पांचा मार्ग मोकळा केला आहे. विमानपत्तन प्राधिकरणाच्या ट्रान्समीटर व रिसीव्हर स्टेशन्सच्या परिघात असलेल्या इमारतींचा उंचीच्या निर्बंधांमुळे अनेक इमारतींचा पुनर्विकास रखडला होता. विशेषकरुन स्वयंपुनर्विकास प्रकल्प आणि झोपु प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरत नव्हते. हे प्रकल्प व्यवहार्य ठरण्यासाठी दरेकर अभ्यासगटाने त्यांच्या अहवालातील प्रकरण २४ मध्ये रडार अन्यत्र स्थलांतरित करावेत, अशी महत्वपूर्ण शिफारस केली होती. आता हे रडार अन्यत्र स्थलांतरित करण्यात येणार आहेत. तसेच पुनर्विकास प्रस्तावांचा अभ्यास करुन उंचीचा निर्णय घेण्यासाठी समिती देखील स्थापन करण्यात येणार आहे.

दरेकर असेही म्हणाले की, जानेवारी २०२६ मध्येच केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांनी रडार अन्यत्र स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. आता त्याबाबतचे परिपत्रक आलेले आहे. दरेकर अभ्यासगटाने शासनाला अहवाल सादर केल्यानंतर सातत्याने यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला होता. आता या महत्वपूर्ण शिफारशीची अंमलबजावणी प्रत्यक्षात जमिनीवर होईल, प्रकल्पांबाबत नेमलेली समिती शक्य तितक्या लवकर पुनर्विकास प्रकल्पांना मंजुरी देईल आणि या भागातील लोकांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे.


# डॉ. अशोक पोद्दार यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील प्रसिध्द अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अशोक पोद्दार यांचा ५५वा वाढदिवस विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, मोफत हाडांचा ठिसूळपणा तपासणी शिबिर आदी विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला.

डॉ. पोद्दार ॲक्सिडेंट ॲण्ड ट्रॉमा केअर सेंटरच्यावतीने मागील २८ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या अंतर्गत जिल्हाभरात आतापर्यंत १७० मोफत आरोग्य शिबिरे घेण्यात येऊन रुग्णांना अल्प दरात औषधीचे वितरण करण्यात आले. दरवर्षी उन्हाळ्यात हॉस्पिटलसमोर पाणपोई सुरू करण्यात येते. शुक्रवारी डॉ. अशोक पोद्दार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त हॉस्पिटलतर्फे रुग्णांची मोफत हाडांच्या ठिसूळपणाची तपासणी करण्यात आली. राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच संकुलाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्षा के. ए. जायेभाये यांनी डॉ. पोद्दार यांचा सत्कार केला. यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, सामाजिक कार्यकर्ते अभिजीत देशमुख, आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. अभय कदम, डॉ. दीपक गुगळे, डॉ. सुरेश भट्टड, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. विश्वास कुलकर्णी, जयेश बजाज, डॉ. प्रसाद उदगीरकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# काळा मारुती मंदिरामध्ये सर्वाधिक गर्दी; मिरवणुकीत तरुणांचा जल्लोष: रक्तदान शिबिर

धाराशिव (शेख अंजुम)- शहरातील काळा मारुती मंदिरासह बोंबले हनुमान मंदिर, समता नगरमधील इच्छापूर्ती श्री महारुद्र हनुमान मंदिर, विकास नगर डी-मार्टजवळील हनुमान मंदिर, हनुमान चौकातील हनुमान मंदिर, पंचमुखी हनुमान मंदिर, धारासूर मर्दिनी मंदिर परिसर, तसेच सेंद्रया मारुती मंदिर, गणेश नगरातील हनुमान मंदिर आणि पाथरूड गल्लीतील हनुमान मंदिर येथे मोठ्या उत्साहात विविध धार्मिक कार्यक्रमांद्वारे हनुमान जयंती साजरी करण्यात आली.

सकाळी ६ वाजता जन्मोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर दिवसभर खीर प्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी छत्रपती शिवाजी चौकात जय बजरंग ग्रुपच्या वतीने डीजेच्या तालावर तरुणांनी जल्लोष करत मिरवणूक काढली. मध्यवर्ती भागातील काळा मारुती मंदिरात सकाळी ६ वाजता नियमित पूजा करून जन्मोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर सकाळी ७ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत खीर वाटप करण्यात आले. येथे ४ ते ५ हजारांहून अधिक भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. शहरात सर्वाधिक गर्दी काळा मारुती मंदिरात झाली होती.

काळाराम मारुती मंदिर येथे हनुमान जयंतीनिमित्त भक्तांची वाढती गर्दी लक्षात घेऊन धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मंदिर व्यवस्थापनाने स्वतंत्र दर्शनरांगेची सोय केली होती. उन्हापासून बचावासाठी मंडप उभारण्यात आला होता.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात मारुतीच्या १२ फूटी मूर्तीने वेधले लक्ष शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जय बजरंग ग्रुप, धाराशिवच्या वतीने १२ फूट उंच विविध रंगातील आकर्षक बजरंग बलीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. सायंकाळी सुमारे ७ वाजता डीजेच्या तालावर तरुणांनी जल्लोष करत उत्साहात सहभाग घेतला. भव्य बजरंग बलीच्या मूर्तीपाठीमागे प्रभू श्रीराम चंद्रांची मूर्ती पाहण्यासाठी धाराशिवकरांची मोठी गर्दी जमली होती. या उपक्रमातून धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक उत्साह एकत्र दिसून आला. तरुणांचा जल्लोष पाहायला मिळाला. सकाळी ८ वाजल्यापासूनच अनेक हनुमान भक्त आपल्या कुटुंबीयांसह दर्शनासाठी येऊ लागले होते. सकाळी ८ ते दुपारी १२ आणि दुपारी ४ नंतर रात्री ९ वाजेपर्यंत मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. दिवसभरात ७ ते ८ हजार भाविकांनी दर्शनासह प्रसादाचा लाभ घेतल्याची माहिती मंदिराचे सेवक रामभाऊ वैद्य यांनी दिली. शहरातील काळा मारुती मंदिराच्या दर्शनी भागात प्रभू श्रीरामचंद्र आणि बजरंगबली हनुमान यांच्या प्रतिमांवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती, ज्यामुळे भाविकांचे विशेष लक्ष वेधले गेले.

इच्छापूर्ती मंदिरात ४००० भक्तांना महाप्रसाद वाटप शहरातील समता नगरच्या श्री इच्छापूर्ती श्री महारुद्र हनुमान मंदिरात सकाळी ६ वाजता जन्मोत्सव साजरा झाला. त्यानंतर सकाळी ८ ते सायंकाळी ८ पर्यंत महाप्रसाद वाटप



केला. दिवसभरात ३ ते ४ हजार भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सकाळी १० वाजता संतोषी माता महिला भजनी मंडळ, धाराशिवतर्फे भजन सेवा झाली. यावेळी हिराबाई पवनेरकर, सुलोचना मुसळे, जगदेवी जमादार, माया गोरे, स्वाती लांडगे, ढोलकी वादक देशमुख यांच्यासह अन्य महिला सदस्य भजनासाठी सहभागी झाल्या होत्या. यावेळी रक्तदान शिबिरासाठी शसकीय रक्तेपेढीचे योगदान लाभले. इच्छापूर्ती श्री महारुद्र हनुमान मंदिर देवस्थानचे अध्यक्ष गिरीश पाळणे, उपाध्यक्ष अमोल निरफळ यांच्यासह मंदिर व्यवस्थापनाच्या अन्य पदाधिकाऱ्यांचे मोठे योगदान लाभले.

## उमरग्यातील हनुमान मंदिरात जन्मोत्सव साजरा: भजन, कीर्तन, महापूजा व अभिषेक


उमरगा(प्रतिनिधी)-वृंदावन नगर-मलंग प्लॉट भागातील श्री हनुमान मंदिर देवस्थान येथे श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न झाला. प्रती वर्षाप्रमाणे, येथे बुधवारी व गुरुवारी भजन, कीर्तन, प्रवचन, हरिजागर आदीसह धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

बुधवारी (दि. ०१ एप्रिल) हभप अरुण मुळजे महाराज रामलिंग मुदगड भजनी मंडळाचा कार्यक्रम संपन्न झाला. गुरुवारी (दि. ०२ एप्रिल) कासार शिर्शी येथील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्यवस्थापक महेश कल्याणी यांच्या हस्ते श्रींची महापूजा व अभिषेक करण्यात आला. संगमेश्वर स्वामींच्या अध्यात्मिक पौराहित्यातून भाविकांना लाभ झाला. नगर परिषद नगराध्यक्ष किरण गायकवाड, उपनगराध्यक्ष विजय वाघमारे, डॉ. सचिन तावशीकर, डॉ. नामदेव बिराजदार, डॉ. विकास राठोड, डॉ. निलेश येळापूरे, डॉ. दत्तात्रय खलंगरे, साहिल इंगळे, अशोक चोबे यांच्या हस्ते महाआरती पार पडली.

यासाठी राजकुमार दुधनाळे, सुधीर कुरूम, भरत चौधरी, दयानंद बिराजदार, प्रदीप गावकरे, प्रा. युसूफ मुल्ला, काशिनाथ कोठे, दयानंद बिराजदार, शंकर बिराजदार, शोभा बिराजदार, सुजाता कुरूम, कोमल जवळगे, अंजली दुधनाळे, सुजाता हेबळे, सुनिता हंगरगे, संगीता पाटील, सुनिता पवार, सुषमा तोळणूरे, उज्वला होगाडे, मधुमती सुर्यवंशी, मुरुमकर यांच्यासह मलंग प्लॉट व वृंदावन नगर पिस्के प्लॉट भागातील श्री हनुमान भक्तांनी जन्मोत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

हनुमानाची हुबेहुब रांगोळी गुरुवारी सकाळी हनुमान जन्मोत्सव महिला भक्तगणांच्या वतीने साजरा करण्यात आला. या निमित्ताने गुलालाची उधळण करण्यात आली, तर वैष्णवी जवळगे, नेहा दुधभाते, साक्षी दुधनाळे यांनी श्री हनुमानाची अप्रतिम हुबेहुब रांगोळी काढून भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

## पंधरा दिवसांत चौथ्यांदा अवकाळी, द्राक्ष बागा, केळीला बसला फटका



भूम (प्रतिनिधी)- तालुक्यात गुरुवारी सायंकाळी आठ वाजेच्या सुमारास झालेल्या अवकाळी पाऊस व जोरदार वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांसह फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. चिंचपूर ढगे परिसरात या आपत्तीचा विशेषतः तीव्र फटका बसला असून अनेक पिके जमीनदोस्त झाली आहेत. तालुक्यातील चिंचपूर ढगे येथील अक्षय गोकुळ ढगे यांच्या शेतातील द्राक्षबाग पूर्णपणे कोसळली आहे.

या नुकसानीचा प्राथमिक अंदाज ३० ते ४० लाख रुपयांपर्यंत असल्याचे सांगितले जात आहे. या सोबतच तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ज्वारी, हरभरा, गहू या रब्बी पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काढणीस आलेली पिके पावसामुळे आडवी पडली असून काही ठिकाणी भिजल्यामुळे गुणवत्ता घसरली आहे. त्यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.फळबागांनाही या अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला असून आंबा व चिंच या झाडांवरील फळे मोठ्या प्रमाणावर खाली पडली आहेत. अनेक ठिकाणी ही फळे खराब होण्यास सुरुवात झाली असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढले आहे. अचानक आलेल्या या संकटामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त भागांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे सचिन , वय ३५ वर्षे, नाईकचाकुर ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.०३.०४.२०२६ रोजी १७.०० वा. सु. आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे १,८०० किंमतीची १८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर विकास वय ३७ वर्षे, रा. कराळी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.०३.०४.२०२६ रोजी १७.४५ वा. सु. सुमारास कराळी पाटी जवळ अंदाजे ३,२८० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ८० सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

## कवठा परिसरात बसवला १०० एचपी रोहित्र: ग्रामस्थांना दिलासा, जि. प. सदस्य महेश देशमुख यांच्या स्वखर्चातून उभारला



नारंगवाडी (प्रतिनिधी)- उमरगा तालुक्यातील कवठा गावातील सोनार डीपी परिसरात गेल्या काही दिवसांपासून विजेअभावी शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती शेतीपंप बंद पडल्याने पिकांसाठी आवश्यक पाणीपुरवठा ठप्प होता. तर जनावरांना पाणी देण्यासाठीही शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत होती. अनेक वेळा जनावरांना पाणी मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत होते.

वाढत्या उन्हाच्या तीव्रतेत शेती आणि पशुधन दोन्ही धोक्यात आले असताना जिल्हा परिषद सदस्य महेश देशमुख यांनी तातडीने पुढाकार घेत स्वखर्चातून नवीन १०० एच डीपी बसवून देत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला. परिस्थिती गंभीर बनत चालल्याचे लक्षात येताच महेश देशमुख यांनी निवडणुकीत दिलेले आश्वासन केवळ शब्दांपुरते न ठेवता निवडणुकीनंतरही प्रत्यक्ष कृतीत उतरवले या पहिले ही त्यांनी स्वतः खर्चातून २० पेक्षा ज्यास्त डीपी बसवून दिले आहेत.महेश देशमुख यांनी निवडणुकीच्या काळात गावोगावी जाऊन विकासकामांची दिलेली आश्वासने प्रत्यक्षात पूर्ण करण्यावर भर दिला असून, निवडणुकीनंतरही सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्याची भूमिका कायम ठेवली आहे. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या कामासाठी धीरज सोनवणे हणमंत सांगवे व त्यांच्या सहकाऱ्यांचेही सहकार्य लाभले. लाभार्थी शेतकऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त करत अडचणीच्या वेळी प्रत्यक्ष मदतीला धावून येणारे नेतृत्वच खऱ्या अर्थाने लोकांचे असते; ही मदत आम्ही कधीच विसरणार नाही, अशी भावना व्यक्त केली.

## उमरग्यातील जुन्या झाडांचा नागरिकांना वाढला धोका

उमरगा -शहरातील राष्ट्रीय महामार्गालगतची जुनी झाडे धोकादायक बनली आहेत. जोरदार पाऊस, वादळी वाऱ्याने जुनाट झाडे उन्मळून पडत आहेत. यामुळे मार्गावरील जुनी झाडे धोकादायक बनली आहेत, ती हटवण्याची गरज आहे. शहराच्या मध्य भागातून गेलेल्या या सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. सध्या अवकाळी जोरदार पाऊस व वाऱ्यामुळे मार्गावरील अनेक झाडे उन्मळून पडत आहेत. केव्हा, कधी धोकादायक वृक्ष कधीही उखडून किंवा एखादी मोठी फांदी वाहनावर पडून मोठी हानी होण्याचा धोका आहे. अलीकडेच जोराच्या झालेल्या पावसामुळे परिसरातील अनेक झाडे उन्मळून पडली तर अनेक झाडांच्या फांद्या तुटल्या आहेत. परिणामी या मार्गावरील वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. गतवर्षी रात्री शासकीय विश्रामगृहाजवळ जुनाट व मोठे झाड कोसळले. संबंधित विभागाने रस्त्याच्या दुतर्फा असलेली जुनाट, धोकादायक झाडे हटवण्याची व फांद्या छाटण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

बुधवारी (दि. १) सायंकाळी वादळी वाऱ्यात राष्ट्रीय महामार्गालगत जुनाट बाभळीचे झाडे दुचाकी दुरुस्तीच्या दुकानावर झुकले असून, दुकानाचे पत्रे झाडाच्या विशाल फांदीने धोका निर्माण झाला आहे. संबंधित प्रशासनाने त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. या मार्गावर वाहनांची संख्या तसेच शाळा अन् कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही खूप मोठी आहे. काही विद्यार्थी चालत, सायकलने तर काही विद्यार्थी बसने या मार्गावरून ये जा करतात, त्यामुळे त्यांच्या जीवीतासही धोका असल्याने धोकादायक झाडे, फांद्या हटवणे गरजेचे आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

### धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649